शिरडीस जाऊन या म्हणजे प्रचिती येईल असे सांगितले.

शिरडीस केव्हा जाऊ ? असे सावंत यांनी विचारताच प्रभाकरमहाराज म्हणाले, **'बाबांचे बोलावणे येईल, ते आदेश देतील तेव्हा ते आपोआप घडेल.'** इ.स. १९४७ मध्ये सावंत यांची पत्नी कॅन्सरच्या रोगाने निधन पावली आणि अशा दु:खात असतानाच त्यांचे साडू एके दिवशी आले आणि म्हणाले - 'मी शिरडीला साईबाबांच्या उत्सवास जाणार आहे तुम्ही पण चला, तेव्हढाच बदल होईल व दु:खाचा विसर पडेल.' साडूंच्या रूपाने आपणास बाबांचेच बोलावणे आले आहे असे मी समजून गेलो आणि त्वरित होकार दिला. प्रभाकरमहाराज म्हणाले होते की 'वेळ आली की बाबांचा आपोआप आदेश येईल.' त्या गोष्टीची मला प्रचिती आली आणि शिरडीला जाऊन साईदर्शन घेण्यापूर्वीच साईमहिम्याने मी भारावून गेलो.

इ.स. १९४७ साली दसऱ्याचा श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव प्रथमच श्री. सावंत यांनी पाहिला. त्या कृतार्थ क्षणांची - त्या काळाची आठवण आजही श्री. सावंत काल-परवा घडलेल्या घटनेसारखी भावविभोर होऊन सांगतात. ''मुंबईहून आम्ही रेल्वेने मनमाडपर्यंत गेलो. तेथून कोपरगावला गेलो. कोपरगाव ते शिरडी अंतर ५-६ मैल होते व त्यावेळी वाटेतील गोदावरी नदीवर आजच्यासारखा पूल नव्हता. छोट्या छोट्या लाँचमधून सर्व साईभक्तांना नदीपार करून पलिकडे जावे लागे. पलिकडे टांगे मिळत. ते शिरडीपर्यंत भक्तांना घेऊन जात, पण आम्ही पायीच गेलोत. त्यावेळी सुमारे २-२॥ तास आम्हाला लागले.''

मंदिराच्या समोरच भक्तांना उतरण्यासाठी दोन चाळीवजा इमारती होत्या. तेथे आम्ही उतरलो. फारशी गर्दी नव्हती. सुमारे २५०-३०० साईभक्त जमलेले होते. त्यातही मुंबईच्या भक्तांचीच संख्या मोठी होती. त्यावेळी भक्तांच्या राहण्याची व जेवण्याची-प्रसादाची व्यवस्था विनामूल्य केली जात असे. ३ दिवस बाबांचा समाधीउत्सव भावभक्तीने पार पडला. त्यावेळी समाधी मंदिरात समाधीमागे बाबांचा पुतळा नव्हता, फोटो होता. सर्वश्री नागे सावंत, नानासाहेब रासने, राणे, दाभोळकर ही प्रमुख मंडळी सर्व व्यवस्था पहात होती. दासगणूंचे शिष्य अनंतराव आठवले यांची ३ दिवस कीर्तने झाली होती. त्या कीर्तनाचा थाट आजही मला आठवतो.

पुढे मी दरवर्षी रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा अशा तिन्ही उत्सवांना नियमितपणे जाऊ लागलो आज ४९ वर्षे झाली बाबांच्या कृपेने त्यात कधीही खंड पडलेला नाही. यंदाचा हा दसरा उत्सव माझा शिरडीतील ५०वा दसरा उत्सव आहे. अशाप्रकारे बाबांच्या कृपेने मला पुण्यतिथी उत्सवास हजर राहण्याची सुवर्णमहोत्सवी संधी मिळत आहे.

आज ८१व्या वर्षीही माझी तब्येत अगदी उत्तम-खणखणीत आहे ही बाबांचीच कृपा आहे. अनेक संसारी आघात व पत्नीचा वियोग सहन करूनही मी जो निरामय जीवन जगत आहे तेही बाबांमुळेच मला शक्य झालेले आहे. रोज मी साईसच्चरित पोथीतील ११ व १५वा अध्याय वाचतो. दर गुरूवारी 'साई सगुणोपासना' करतो. एका उत्सवात खुद्द बाबांनीच मला स्वप्नात येऊन **'चल उठ आरती सुरू झाली आहे झोपलास काय ?'** असे म्हणून उठविलेले आहे. हा माझ्या जीवनातील परमभाग्याचा क्षण आहे. त्याशिवाय शिरडीतील मंदिराचा कळस बसविण्याचा, बाबांची मूर्ती स्थापन करण्याचा व बाबांच्या ५०व्या पुण्यतिथीचा असे प्रमुख सोहळे मला पहायला मिळाले त्या सोहळ्यात भाग घ्यायला मिळाले हे माझे जीवन कृतार्थ करणारे प्रसंग आहेत. आता यापुढे जोवर जीवात जीव आहे तोवर शिरडीची वारी न चुकविण्याची दुर्दम्य इच्छा आहे. **'खोटी ठरो न देवा। ही एक आस मोठी॥**

(शब्दांकन : विद्याधर ताठे)

## "साई माझा देव"

*साई तुझे नाव ठाव नाही गांव*
*आई होऊनीया घेतलीस धांव*
*अवतार तुझा भक्त तारावया*
*वंदन करीती सारी तुज दुनिया*
*तव चरणांची लागली मज हाव*
*साई तुझे नांव ठाव नाही गांव ॥धृ०॥१॥*

*आलासी कुठूनी गेलासी तू कुठे ?*
*आम्ही आडमुठे पहातो आडवाटे*
*लीला तुझी ती आम्हासी कळेना*
*शीला होऊनीया अहिल्या दिसेना*
*शीलेवर बसूनी दाखवीला भाव*
*साई तुझे नांव ठाव नाही गांव ॥२॥*

*भेट देई भक्ता करी मज मुक्ता*
*एकेश्वरी सत्ता तुझी साईनाथा*
*धर्मदास म्हणे साई माझा देव*
*साई तुझे नांव ठाव नाही गांव ॥३॥*

❑ **धर्माजी पाटील**

# सर्व साईभक्तांनाआवाहन

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे, श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत
**विद्याधर ताटे**
कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला'**

---------- इथे कापा ----------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता. क्र.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# गुरुपौर्णिमा उत्सव : काही क्षणचित्रे



श्री द्वारकामाईतून निघालेली पोथीची मिरवणूक.



कीर्तनात रंगलेला एक क्षण.
कीर्तनकार श्री. गंगाधरबुवा व्यास यांच्यासमवेत
अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर फुगडी खेळताना.



उत्सवातील रात्री श्री बाबांपुढे श्री. अजय पोहनकर
यांची रंगलेली एक गायन मैफिल.




श्री साईसच्चरित् पोथी मिरवणुकीचे समाधी मंदिराच्या
महाद्वारात आगमन.




उत्सवातील आणखी एक मैफिल :
संगीत सेवा करताना विपुल कुर्लेकर आणि साथीदार.

# श्री साईलीला




श्री साईबाबा समाधी मंदिर : उत्सवातील विद्युत रोषणाईचे दृष्य.

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक नोव्हेंबर-डिसेंबर १९९६/रुपये ८

# श्री साईलीला



॥ भगवान दत्तात्रय ॥ ॥ Lord Dattatreya ॥



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर (सदस्य)
श्री. रमेश हा. सोनी ''
श्रीमती रेखा ग. दिघे ''
श्री. प्रकाश व. कारखानीस ''
श्री. मुकेश र. पटेल ''
श्री. मधुकर द. जोशी ''
श्री. प्रकाश पी. वैशंपायन ''
श्री. मधुकर ज. गर्दे पाटील ''
श्री. देवकीनंदन सारस्वत ''
श्री. आप्पासाहेब खं. कोते ''

श्री. रायभान ग. चिने (सदस्य)
श्री. भास्कर शं. बोरावके ''
श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील ''
श्री. राजीव पुं. रोहोम ''
श्री. संभाजी कि. काळे ''
श्री. अशोक भि. खांबेकर ''
सौ. प्रेमाबाई सो. बज ''
श्री. रामचंद्र नि. गोसावी ''
श्री. प्रभाकर तु. बोरावके ''
श्री. सोपान मा. धोर्डे ''

कार्यकारी अधिकारी : श्री. स. स. पेंडसे

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक ८-९

नोव्हेंबर-डिसेंबर १९९६

: संपादक :
**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :
**विद्याधर ताठे**

: कार्यालय :
'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :
**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :
**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



# अंतरंग

- **संपादकीय :** विद्याधर ताठे — २
- **श्री साईबाबांची बोधवाक्ये :** वसंत दळवी — ४
- **साईभक्त कृष्णराव भीष्म :** भालचंद्र भीष्म — ९
- **दत्तजन्माच्या पुराणकथा :** गजानन कुलकर्णी — १२
- **साई वंदना** (कविता) — १७
- **राजापूरची पावनगंगा :** मधुसुदन सामंत — १९
- **जैसा निर्वातीचा दीपु :** एस. ए. कुलकर्णी — २६
- **अध्यात्मज्ञान एक चिंतन :** रा. वा. सिंगनूरकर — ३०
- **जेरुसलेममध्ये व्हायला हवी शिरडी :** अरुण जाधव — ३३
- **श्रीदत्तपुराण** — ३६
- **शैव आगमातील योगमार्ग :** डॉ. ग. वा. तगारे — ४०
- **ग्रंथपरिचय -१२१ गणेशदर्शन :** श्रीसाईचरणकण — ४२
- **अभिप्राय** — ४४
- **साईभक्तांना आवाहन** — ४६
- **ग्रंथसूची** — ४७

# संपादकीय

विद्याधर ताठे

**हे साईनाथ सद्‌गुरु । तूच माझा कल्पतरु ।**
**भवाब्धीचे भव्यतारु । तूच असशी निश्चये ॥**
**तूच सद्‌गुरु मच्छिंदर । तूच महात्मा जालंदर ।**
**तू निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेख नाथ तू ॥**

शिरडीचे श्री साईनाथ हा अगाध, अनंत, अवर्णनीय अशा सनातन ब्रह्मचैतन्याचाच एक ईश्वरी अवतार आहे. 'सबका मालिक एक' हा साईबाबांचा संदेश, 'एकम् सद् विप्रा बहुदा वदन्ति' या महावाक्याचाच कालसापेक्ष आविष्कार आहे. श्री साईबाबांच्याअनंत लीला एकेका महावाक्यांचा बोध प्रकट करणाऱ्या आहेत. बाबांनी प्रवचनं-कीर्तनं-निरुपणं केलेली नाहीत, ना एखाद्या ग्रंथ-पोथीचे लिखाण केलेले आहे. त्यांच्या कृतीतून त्यांनी नव्या उदात्त मानव धर्माचे दर्शन घडविले व तो अनुसरण्याचा भक्तांना नकळत संदेश दिला. हा शब्दातीत संदेश-प्रबोध हेच श्री साईबाबांचे विश्व मानव धर्माच्या स्थापनेतील योगदान असून या महान कार्याबद्दल अवघी मानवजात श्री साईबाबांची मंगलऋणी आहे.

श्री साईबाबांच्यासंदेश प्रचारार्थ 'श्री साईलीला' मासिकाचा जन्म (१९२३) झाला असून पुढील वर्षी (एप्रिल ९७) हे मासिक आपली ७४ वर्षांची वाटचाल पूर्ण करून अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. ७५ वर्षांचा वारसा असणारे मराठीतील श्री साईलीला हे एकमेव परमार्थिक नियतकालिक असून अमृतमहात्सवी वर्षात अनेक नवे उपक्रम हाती घेण्याचा संपादक व विश्वस्त मंडळ विचार करीत आहे.

**गुरुने दिला ज्ञानरुपी वसा ।**
**आम्ही चालवू हा पुढे वारसा ॥**

असा आमचा संकल्प व निर्धार असून गेल्या वर्षभर सर्वच्या सर्व अंक वेळेवर प्रकाशित करण्यात आम्हास श्री साईबाबांच्या कृपेने यश लाभलेले आहे. साईकृपेने व आपणा सर्वांच्या सदिच्छा-सहकार्याने, श्री साईलीला मराठीतील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य नियतकालिक व्हावे असा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी सर्व साईभक्तांनी वर्गणीदार वाढविण्याच्या मोहिमेत सहभागी होऊन सक्रिय साईसेवा करण्याची नितांत गरज आहे. ५ पेक्षा अधिक वर्गणीदार करणारांची नावे 'आदर्श साई प्रचारक' म्हणून आम्ही गेल्या अंकापासून प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केलेला आहे. **न्हावू साईलीला रंगी । साईदीप लावू**



**जगी ।** असा निर्धार करून आपणही आमचे प्रयत्न यशस्वी करावेत ही विनंती.


प्रस्तुत अंकामध्ये 'दत्त जयंती' हा शिरडीत साजरा होणारा उत्सव लक्षात घेऊन भगवान दत्तात्रयाचे महात्म्य कथन केलेले आहे. श्री साईंना अनेक भक्त भगवान दत्तात्रयाचा अवतार मानतात. **जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।** श्री साईद्वारे प्राप्त झालेला आहे. साईभक्त कृष्णराव भीष्म यांचा जीवनपरिचयही साईभक्तांना निश्चितच उद्‌बोधक वाटेल. अन्य साहित्यही पारमार्थिक मनाच्या वाचकांना चिंतनीय-मननीय वाटेल असा विश्वास आहे. शिरडी येथे साजऱ्या झालेल्या श्री साई पुण्यतिथी उत्सवाचे सचित्र वर्णन अनेक वाचकांना या अंकात अपेक्षित असेल; त्यांना पुढील अंकापर्यंत थोडी सबुरी दाखवावी लागेल. जानेवारी-फेब्रुवारी अंकात दसरा उत्सवाची रंगीत क्षणचित्रे आम्ही प्रकाशित करीत आहोत.

दसऱ्यानिमित्तचा श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक आवडल्याची असंख्य पत्रे आमच्याकडे आलेली आहेत. त्यापैकी काही पत्रांना आम्ही या अंकात प्रसिद्धी दिलेली आहे. 'वाचकांचे मत' हे नियतकालिकाच्या-वृत्तपत्रांच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचे असते. वाचकांची पत्रे ही नियतकालिकाच्या एकूण स्थिती-गतीचे नेमके दर्शन असते. आपणही आपला उचित अभिप्राय कळवून आम्हाला यथायोग्य मार्गदर्शन करावे ही विनंती.

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक

# श्री साईबाबांची बोधवाक्ये : एक चिंतन

– वसंत दळवी, ठाणे.



— ❖ ❖ ❖ —

***श्रद्धा व सबुरी हा बाबांचा संदेश आहे. तसेच बाबांची बोधवाक्ये ही भक्तांना बोध देऊन त्यांचे कल्याण साधणारी आहेत. श्री साईबाबांच्या बोधवाक्यांचा या लेखात घेतलेला परामर्ष, अनेकांच्या चिंतनास उपयुक्त ठरणारा आहे.***

— ❖ ❖ ❖ —

श्री साईबाबांचे शेकडो भक्त आज जगभर विखुरलेले आहेत. शिरडीसारख्या छोट्या गावातील ह्या संताने, महापुरुषाने लाखो भक्तांची आयुष्ये उजळून काढली. सर्वांच्या हृदयात अढळ स्थान मिळविले. युगातील हा चमत्कार, श्री साईबाबांच्या भक्तांवरील निरपेक्ष, निर्व्याज प्रेमाचा आहे. ह्याला चमत्कार म्हणणही चुकीचं आहे. आईचं आपल्या मुलावरचं प्रेम ही नैसर्गिक घटना आहे. ईश्वराचं भक्तावरील प्रेम आणखी वेगळं कसं असू शकेल ? द्वारकामाईत बसून श्री साईबाबा प्रेमाची उदी मुक्तपणे स्वहस्ते सर्वांना देत होते. गोणी भरभरून वाटली. 'जो जे जे वांछील तो ते लाहों।''चे पसायदान श्री ज्ञानेश्वर माऊलीने विश्वात्मक देवाजवळ सर्व प्राणीमात्रांसाठी मागितले. श्री साईबाबांनी ज्यांनी जे मागितले ते दिले. आजही भक्तांच्या इच्छा पूर्ण करत आहेत.

श्री साईबाबांचा द्वारकामाईतील दरबार सर्वांसाठी खुला

होता. सर्वार्थाने तो 'धर्माधिष्ठित' पण धर्मातीत व धर्मनिरपेक्ष होता. जाती, पंथ, गरीब, श्रीमंत तेथे भेद नव्हता. सर्वच त्या परमेश्वराची लेकरं. तेथे लहान-थोर कसा असू शकेल ? तेथे भेद नव्हता तर तुमचा मनातला भाव ओळखला जात होता. एकाच धर्माचं आणि एकाच परमेश्वराचं ते स्थान होतं. 'मानवता' नावाच्या महानधर्माची शिकवण एक महान मानव देत होता. परमेश्वर एकच आहे आणि तो सर्वाठायी आहे. हा विश्वात्मक सर्व विश्वाचा आहे. सर्वांभूती तोच वसलेला आहे. हे जाणा. हीच ती महान शिकवण छोट्या छोट्या गोष्टींतून बोलांतून ते आलेल्या भक्तांना देत असत.

श्री साईबाबांनी कधी उपदेशात्मक प्रवचने दिली नाहीत की गहन शब्दात शुष्क तत्त्वज्ञानाचे विवेचन केले नाही. त्यांचे साधे, सरळ, सोपे 'बोल' साऱ्या तत्त्वाचं सार असे. अंत:करणाचा ठाव घेणारे त्यांचे बोल असत. तर कधी बोधप्रद गोष्टींतून एखादे तत्त्व सांगत. त्यांचे बोल अमृताचे बोल आहेत. सूत्ररुपाने सांगितलेली ही वचने म्हणजे मौलिक विचारांचे धन आहे. त्यांचं मनन करणाऱ्या भक्ताचं कल्याण साधणारी ही वचने आहेत, तर अध्यात्माच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या साधकाच्या मार्गावरील हे प्रकाशदीप आहेत. त्या प्रकाशात साधकाला आपला मार्ग स्पष्ट दिसेल. परमेश्वर आपला पाठीराखा आहे ह्याचा अनुभव त्याला येईल. त्यासाठी चिकाटी हवी. प्रयत्न हवा. निनीध्यास हवा. गीताईत म्हटल्याप्रमाणे **'उद्धरावा स्वयें आत्मा । खचूं देऊ नये कधी ।'** हे लक्षात ठेवून मार्ग आक्रमायचा. श्री साईबाबांवरील श्रद्धा व निष्ठा पुढचं काम करील. त्यासाठीच सबुरी हवी.

चित्तशुद्धी ही अध्यात्ममार्गावरील पहिली पायरी आहे. ईश्वराच्या दिशेने टाकलेले हे पहिले पाऊल आहे. ही चित्तशुद्धी प्राप्त होण्यासाठी श्री साईसच्चरित्राचा अभ्यास म्हणजेच पारायण व त्यांच्या वचनांचे सतत चिंतन, मनन होणे आवश्यक आहे. सर्वसामान्य माणसालाही सुखी समाधानी जीवन जगण्यास शिकवणारी ही सूत्रे व वचने आहेत. त्याप्रमाणे आचरण ठेवल्यास सर्वसामान्य माणूस नितीमान होईल. जीवनात संतुष्ट राहील. तर साधकाची परमार्थावरची वाटचाल सुलभ होण्यास मदत होईल. काही नेमकी, मोजकी सूत्रे व वचने देत आहे त्यावरून कल्पना येईल.

**'जसे त्याने ठेवले आहे, तसेच राहा.'** म्हणजे हव्यास नको. लोभापाठी येणारा स्वार्थ आपोआप गळून पडेल. जे काम अथवा कर्तव्य आपल्या वाट्याला आले आहे, ते मन:पूर्वक आनंदाने करा. कर्माचं फल द्यायचं की नाही ते परमेश्वर ठरवणार आहे. आपण व्यर्थ चिंता कशाला करायची ? खरं म्हणजे ज्याला कर्म वा कर्तव्य करण्यातच समाधान व आनंद मिळतोय त्याच्या मनात फलाची इच्छा, अपेक्षा उद्भवणारच नाही. त्यात आयुष्य तृप्त व निश्चिंतच असणार. **'वाद घालू नका.'** त्यात वेळेचा अपव्यय आहे. तोच वेळ नामस्मरणात घालवला तर कितीतरी फायदा होईल.

केलेल्या कर्माचे फळ प्रत्येक व्यक्तीला भोगावेच लागते. फक्त त्याची प्रचिती कधी त्वरित येते तर कधी ती विलंबाने येते. **'पुनरपी जननम्, पुनरपी मरणम्'** हा कर्मसिद्धान्त आहे. श्री साईबाबांनी अनेक कथांमधून त्याचा पुनरुच्चार करून सर्वांना सावध राहण्याचा उपदेश केला आहे. बरे-वाईट कोणतेही कर्म करा त्याचे बरे-वाईट फळ मिळणारच, तेव्हा प्रत्येक कर्म सद्हेतूपूर्वक व चांगले करण्याची पराकाष्ठा करा. बाबा नेहमी सांगत, **'जसे जो करील तसे तो भरील.'** **'जशी त्याची नियत तशी त्याची बरकत.'** हा विचार प्रत्येक माणसात दृढ झाला तर नवा माणूस, नवा समाज निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. अहंकार, स्वार्थ, लोभ, ईर्षा ह्यापोटी निर्माण होणारी जीवघेणी स्पर्धाच माणसाला विवेक विसरायला लावते. जीवनाच्या अखेरीस त्याला ज्ञान होते की पापाचारणातून कमावलेल्या पैशाला व क्षणैक यशाला काही किंमत नाही. दु:ख, क्लेष, मन:स्ताप हेच आपल्याभोवती फेर धरून नाचत आहेत. ह्याउलट सन्मार्गाने व सदाचाराने वागून मिळवलेलं धन, यश हे कितीतरी पटीने सुखदायक व आनंददायक असू शकते, हे समाजातील अशा सत्प्रवृत्त कुटुंबातून डोकावून पाहिले तरी कळून येईल. **'जे पेरले तेच उगवते'** तेव्हा तुमचा विचार व आचार नेहमी उच्च असावा. म्हणून आपले पूर्वज प्रार्थना करीत **''आ नो भद्रा: ऋतवो यन्तु विश्वत:''** (ऋग्वेद.।.८९-१) उदात्त विचार सर्व बाजुंनी आमच्याकडे येवोत. हे तत्त्व बिंबवण्यासाठी श्री साईबाबा द्वारकामाईत बसून भक्तांना उपदेश करीत, बाबांनो, **'ज्याचा इरादा चांगला, त्याचे सगळे चांगले'**, **'आपुले करम आपुल्यासंगे, दुनियाचे दुनियासंगे'** ह्यातलं मर्म लक्षात आल्यास मनातला संघर्ष कमी होईल. माणसं विवेकाने वागू लागतील. आचार-विचार करण्याचे मर्म सांगून बाबा सुखी, समाधानी, तृप्त आयुष्य कसे जगावे याचे मार्गदर्शन ते सांगतात, 'त्याच्या मर्जीत आपण राहावे, तळमळ करू नये', 'त्याच्याशिवाय झाडाचं पान हालत नाही'. कर्ता-करविता तो आहे हा भाव दृढ झाला की सुख-समाधान, शांतीचे दार उघडले जाते. इतरांच्या वागण्या-बोलण्याचा मग आपण वेगळ्या दृष्टीकोनातून विचार करू लागतो. त्यासाठी अगोदर परमेश्वरावर विश्वास ठेवा. श्रद्धेने त्याचे नामस्मरण करा. जसजसं मन शांत होईल तसा त्याचा आवाज ऐकू येईल.

मनाची स्थिरता आली तरच विचारांच्या लाटा स्तब्ध होऊन मन आपोआप शांत व्हायला लागेल. तुमची काळजी पण तोच घेईल. श्री साईबाबा म्हणतात ह्यासाठी तुम्ही एवढच करा. **'सर्व भूतमात्रांशी प्रेमाने वागा, वादावादी करू नका, कोणी काही बोलले तर ऐकून घ्यावे, ज्याचे त्याच्यापाशी'** असे म्हणत स्वस्थ राहावे. त्याच्या स्वभावधर्माने, संस्काराने तो तसा वागला किंवा बोलला' तेव्हा त्याचे त्याचेपाशी राहू द्या, त्याचे बोल आपण मनात बागवून दु:खी कष्टी का व्हावे ?

श्री साईबाबांचा उपदेश सर्वसामान्य संसारी माणसांसाठी, त्याचा संसार सुखी होण्यासाठी आहे. पण तो एकसुरी नाही. अधिकारपरत्वे त्याच्यात भिन्नता आहे. ते अंतर्यामी होते. प्रत्येकाच्या मनातला सूक्ष्मातला सूक्ष्म विचार त्यांना कळत असे. त्या व्यक्तीच्या श्रद्धांना त्यांनी कधी धक्का लागू दिला नाही. 'श्रद्धा आणि सबुरी' हा त्यांचाच महामंत्र आहे. त्यामुळे श्री नानासाहेबांना **'बनते बनते बन जायेगा'**चा सबुरीचा सल्ला दिला तर इतर भक्तांना वेगवेगळ्या साधना सांगितल्या. दर्शनास येणाऱ्या बहुसंख्य भक्तांच्या इच्छा बहुधा सकाम व प्रापंचित असत. त्यांच्या श्रद्धा व भावना व अपेक्षेप्रमाणे त्यांच्या पदरात फळ पडत असे. त्यांच्या दर्शनास येणाऱ्यात खरे जिज्ञासू व आर्त भक्तही असत. त्यांना त्यांची क्षमता पाहून मार्गदर्शन करीत. त्यांच्या निकटवर्तीय व अंतरंगी भक्तांना केलेल्या मार्गदर्शनात, उपदेशात अशीच भिन्नता आढळून येते त्याचे कारण हेच !

श्री उपासनी महाराजांचा दृढभाव व निश्चय पाहून त्यांच्याकडून कठोर तपस्या करवून घेतली. तर नानासाहेब चांदोरकरांचा प्रापंचिक भाव लक्षात घेऊन त्यांना सबुरीचा सल्ला दिला व आश्वासन दिले, 'बनते बनते बन जायेगा'. दासगणुंकडून ओवीबद्ध संतचरित्रे लिहून घेतली. तीर्थयात्रेची त्यांची इच्छा अंगठ्यातून गंगा-यमुना प्रगट करून पावन केले. त्यांच्यालाडक्या शामाला (माधवराव देशपांडे) तीर्थयात्रा घडावी म्हणून केलेले आयोजन 'श्री साईसच्चरित्रात' वाचून मन थक्क होते. शिवाय विष्णुसहस्त्रनामांचे वाचन करून चिंतन करण्याचा उपदेश केला. तात्याबा व बाईजाबाईची अनन्य श्रद्धा व निष्ठा, अन्योन्य भक्तीचे फळ त्यांना ऐहिक संपदा देऊन दिले. तर म्हाळसापतीसारख्या एकनिष्ठ, सच्च्या भक्ताला कधी पैसा दिला नाही किंवा कोणाला देऊ दिला नाही. दिक्षितांकडून ज्ञानेश्वरीचे वाचन करविले व तिचा बोध होण्यास साहाय्य केले. हेमाडपंतांना (श्री. दाभोळकर) आशीर्वाद देऊन त्यांच्याकडून ओविबद्ध 'श्री साईसच्चरित' लिहून घेऊन अनंत भक्तांवरच जणू अनुग्रह केला आहे. त्याच्या पारायणाने प्रापंचिक इच्छा पूर्ण होतातच पण आर्त व जिज्ञासू साधकांना आध्यात्मिक प्रगती व उन्नतीसाठी लाभलेला अमोल ठेवा आहे. तर श्रीमान बुटींकडून मुरलीधराचे मंदिर बांधून घेऊन आपले कायमचे अस्तित्व तेथेच आहे असे सर्व भक्तांना सांगितले नव्हे तर त्याची प्रचिती व अनुभव प्रत्येक साईभक्ताला आजही येते. म्हणून 'श्री साईचरित्रात' हेमाडपंत म्हणतात, **''कोणा हाती बांधिली राऊळे। कोणास किर्तनरंगी लावले। कोणास तीर्थयात्रे धाडिले। मज बसवले लिहावया ॥''** असे अनेकांना अनेक मार्गांनी त्यांच्या श्रद्धांना धक्का न लावता, भावना न दुखावता त्यांचा कल पाहून, इच्छेप्रमाणे मार्गदर्शन केले, करीत आहे व पुढेही अविरत हे कार्य चालूच राहणार आहे.

श्री साईबाबांनी कोणाला गुरु या नात्याने कानमंत्र देऊन उपदेश केला नाही. त्याचे कारण सद्गुरुमधले तत्त्व तेच होते. ब्रह्मस्वरुपी लीन झालेले व एकरुप झालेले रुप होते म्हणजेच परमेश्वरस्वरुप होते. त्यामुळे त्यांची शिष्यपरंपरा नाही तर त्यांचे अगणित भक्त आहेत. ते नेहमी म्हणत, 'भक्तांचा मी दास आहे.' त्यांच्या भावाचा मी भुकेला आहे. परमेश्वराला भक्ताचा भाव हवा असतो. त्यांच्या प्रेमासाठी तो आसुसलेला असतो. ज्ञानेश्वर म्हणतात, **'पै गा भक्ती एकि मी जाणे। तेथे सान-थोर न म्हणे। आम्ही भावाचे पाहुणे। भलेतेया ॥(९-३९१) 'एक पत्र पुष्प फल। ते भजावया मीस केवल। आमचा लागु निखल। भक्तित्वा ॥**(९-३९२).

आम्ही दु:खी कष्टी होतो, राहतो याचे कारण आम्ही **'मी'**ला कधी सोडत नाही. आमचा **'अहं'** मध्ये येतो. शंकाखोर मन डोकं वर काढते. परमेश्वर व आपण यातील भिंत अभेद्य राहते. त्यासाठी हवी असते अनन्यभक्ती, संपूर्ण शरणागती व परमेश्वरावर अढळ विश्वास. मग तुम्ही एक पाऊल त्याच्या दिशेने टाकले तर तो दहा पावले तुमच्याकडे टाकील. म्हणून श्री साईबाबा कळवळून सांगत, 'देव किनई लई कनवाळू आहे. आपणच त्याचेवर भरवसा ठेवत नाही. आणि सबुरी धरत नाही. तो लांब नाही. स्पष्ट शब्दात, अधिकारवाणीने श्री बाबा पुन्हा पुन्हा बजावून सांगतात. 'ईश्वर आहे हे सत्य मान.' 'सर्वत्र परमेश्वरच आहे. आणि सर्व त्या परमेश्वराचं आहे.' 'ईश्वर करील तेच होईल', 'त्याच्या इच्छेशिवाय झाडाचं पान हालत नाही. त्याची कृपा होईल तेव्हा त्याचा रस्ता तोच दाखविल.' हे साधकांना दिलेले आश्वासन देत सांगतात, 'आणि विनाविलंब मनाची मुराद पुरी करील.' श्री साईबाबांनी ईश्वराच्या अस्तित्वाची खात्री निव्वळ शब्दाने नव्हे तर भक्तांना त्यांच्या इष्ट देवतांचे स्वत:मध्ये दर्शन देऊन दिलेले आहे. एका भक्ताने कर्णासंबंधी बोलणे काढले तेव्हा ते स्पष्टपणे म्हणाले, 'हमने

बराबर किया है'. ह्यावर वक्तव्य करण्याची गरज नसावी. आजवर झालेल्या संतमहात्म्यांनी, अलौकिक विभूतींनी परमेश्वराच्या अस्तित्वाची ग्वाही दिलेली आहे. त्यांना आलेले अलौकिक, अतिंद्रिय अनुभव, झालेला साक्षात्कार हे त्यांच्या कठोर तप:श्चर्येचे फळ होय. त्यांच्या शब्दावर किंचितही अविश्वास दाखवणे म्हणजे जगातील सर्व सत्यं-शिवं-मंगल खोटं आहे असे म्हणण्यासारखं आहे. याबाबतीत श्री साईबाबांचे उद्गार स्मरणात ठेवण्यासारखे आहेत. 'मी या द्वारकामाईत बसून सत्यच बोललो आहे.' श्री रामकृष्ण परमहंस यांनी छातीवर हात ठेवून सांगितले, 'ह्या जिभेने कधी असत्य शब्द उच्चारले नाहीत. 'हमने बराबर किया है' म्हणणारे श्री साईबाबा व स्वामी विवेकानंदांना बजावणारे श्री रामकृष्ण 'अरे जो राम होता, जो कृष्ण होता, तोच मी' ह्यातील साम्य व सत्य सहज कळण्यासारखे आहे.

## ऋतनिष्ठा व सत्यनिष्ठा

आजवर सगळे संत, सत्पुरुष, विभूती वेळोवेळी हेच सांगत आले आहेत की ईश्वर सत्य आहे, नित्य आहे, बाकी अनित्य, हे जाणा. ही निष्ठा अढळ ठेवा. ईश्वरच 'सत्' आहे. 'तोआहेच' आहे. तो सरळ, शुद्ध, निर्मळ मनाच्या व आचरणाच्या माणसाला प्राप्त होऊ शकेल. त्यासाठी मन:शुद्धी हवी. सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणश व मनाचा सरळपणा तुमच्या मनाचं मालिन्य दूर करील. ऋग्वेदात त्याचा पुन: पुन: उच्चार केला आहे त्याच ह्या दोन निष्ठा. ऋग्वेदात त्यांना 'सत्यनिष्ठा' व 'ऋतनिष्ठा' असे म्हटले आहे.

आता ऋतनिष्ठा म्हणजे काय ते पाहू. ऋत म्हणजे सरळ. ऋत हा शब्द 'ऋ' या धातूपासून झालेला आहे. त्याचा अर्थ आहे सरळगती, सरळपणा पण सर्वसाधारणपणे 'सृष्टीक्रम' या अर्थाने तो परिचित आहे. ऋग्वेदात 'ऋतस्थ पथ: ।' म्हणजे ऋताचा मार्ग हा शब्दप्रयोग प्रार्थना सुक्तात वारंवार येतो. उदा. 'ऋतस्थ पंथाम् अनुएति साधु ।' म्हणजे उषादेवी ऋताच्या मार्गाने म्हणजे सरळ मार्गाने आपल्या ठराविक क्रमात फरक होऊ न देता जात असते. तसेच एकात म्हटले आहे, 'सुत्रा: ऋतस्थ पन्था: ।' म्हणजे ऋताचा मार्ग आम्हाला सुगम होवो. याचा अर्थ त्याकाळी ऋषी-मुनी प्रत्येकाला त्याने आपले आचरण सरळ ठेवावे असे आग्रहाने प्रतिपादीत असत. 'ऋत' ही त्याकाळची मुख्यत: आचरण्याची बाब होती व माणसाच्या कल्याणाकरता, अभ्युदयाकरता तशी असायलाच हवी. द्युलोकातील सर्व देव ऋताचे म्हणजे सरळपणाचे भोक्ते आहेत, एवढंच नव्हे तर स्वत:ही ऋताचे आचरण करणारे आहेत. द्युलोकातील दिव्य ज्योतिला 'ऋतं ज्योति: ।' आणि 'ज्योति: अवृकं ।' असे ऋषींनी म्हटले आहे. कारण ज्योतिचा प्रकाश नेहमी सरळ जातो. प्रकाशकिरण नेहमी सरळ रेषेत जातात. म्हणून द्युलोकाप्रत जाऊ इच्छिणाऱ्याने ऋताने म्हणजे सरळ मार्गाने गेले पाहिजे. हा ऋषींचा ठाम सिद्धान्त आहे.

ऋतुनिष्ठेबरोबर आणखी एक निष्ठा आवश्यक आहे. ती म्हणजे 'सत्यनिष्ठा'. 'सत्' हा शब्द 'अस्' म्हणजे असणे किंवा अस्तित्वात असणे या धातुपासून झालेला आहे. सत्य हे सत् शब्दाचेच पुढे प्रत्यय आल्यामुळे झालेले रुप आहे. याचा अर्थ सत् किंवा सत्य, म्हणजे विश्वात शाश्वतपणे अस्तित्वात असलेले काही एक आहे, ते होय. या सत्याचे सामर्थ्य अफाट आहे. त्याच्यावरची निष्ठा अविचल, अचलच हवी. सर्व देवदेवता ही सत्याचीच वेगवेगळी रुपे आहेत. सत्यावरील निष्ठा म्हणजे सर्व देव-देवतांवरील निष्ठा होय. कारण तो जो एक आहे, तोच अनेक झाला आहे. ऋग्वेदात त्याला 'एकं सत्' म्हटलं आहे.

ऋग्वेदात शंभरएक देवतांचा उल्लेख आलेला आहे. बहुतेक सुक्तांतून त्यांच्यासाठी प्रार्थना आहेत. 'एकं सत्' तो एक आहे हा महान सिद्धान्त, ही महान निष्ठा त्यांनी एका ऋचेत व्यक्त केली आहे. **'इंद्रं मित्रं वरुणं अग्निम् आहुरयो दिव्य: स सुपर्णोगसत्मान। एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति॥'** अर्थ आहे - यालाच इंद्र, मित्र, वरुण, अग्नि तसेच सुंदर पंखांचा दिव्य पक्षी सूर्य असे म्हणतात. 'एकं सत्' म्हणजे शाश्वतपणे अस्तित्वात असलेल्या त्या एकालाच ऋषी वेगवेगळाली नावे देत असतात. देव एक आहे. त्या एकालाच अनेक नावे दिली. निरनिराळ्या देवता एकाच देवाचे अविष्कार आहेत. तो विश्वव्यापी, अनंत व चिरंतन आहे.

देव आहे व तो कधी नाहीसा होत नाही, कारण 'तो आहेच' तो सर्वांभूती आहे. पाहा म्हणजे दिसेल. श्री रामकृष्ण परमहंस म्हणतात, 'देवात आणि आपल्यात एक झिळझिळीत पडदा आहे. तो दूर करा.' श्री साईबाबा सांगत, 'तुमच्या-माझ्यामधली तेल्या-तांबोळ्यांची भींत पाडून टाका.' तोंडावर रुमाल टाकला तर सूर्य दिसत नाही. त्यासाठी रुमाल काढायला हवा. पण त्यासाठी अनन्यभक्ती, श्रद्धा व संपूर्ण शरणागती हवी तर त्या पडद्यामागे व भिंतीपलीकडचे दिसेल. तुमची श्रद्धा अविचल व दृढ असली तर तुमची आर्त हाक ऐकून परमेश्वर तुमच्यासाठी धाव घेईल. ही श्रद्धा म्हणजे देवावरचा विश्वास. ही श्रद्धा निर्माण कशी होते ? त्याला पुण्यसुकृत म्हणतात. पूर्वजन्मीचे पुण्य असल्याशिवाय ती जागृत होत

नाही. सद्‌गुरुंची भेट होणंही तिच्या अभावी दुर्लभ आहे. हे पुण्यसुकृत म्हणजे पूर्वजन्मींची पुण्यकर्मे व संस्कार. माणूस हा संस्कारांचा पुंज आहे. त्या पुंजीतूनच तो व्यवहार चालवत असतो. जेव्हा त्याला आत्म्याची ओढ लागते तेव्हा हे पुण्यसुकृत जागे होते. त्याला सत्पुरुषाला भेटण्याची ओढ लागते. आणि सद्‌गुरुही त्याला शोधून काढतात. म्हणून श्री साईबाबा म्हणत असत, 'मी माझ्या भक्ताला तो कितीही दूर असला तरी त्याला 'चिडी'सारखा ओढून घेऊन येतो.

भारतीयांमध्ये श्रद्धा हा जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. कारण त्यामागे हजारो वर्षांचे संस्कार आहेत. ऋषीमुनींचे संकल्प आहेत. पाश्चात्य देशात आज खूप प्रगती झाली आहे. समृद्धी आहे. कर्मकौशल्य आहे, ते घेणासारखे आहे. पण भौतिक हव्यासापायी निर्माण होणारी स्पर्धा, स्वार्थ, हिंसाचार ते थांबवू शकले नाहीत. कारण पूर्वसंस्काराचा अभाव. तेव्हा स्वामी विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे दोन संस्कृतीमधील चांगल्याचा समन्वय मानवाच्या उद्धारासाठी आवश्यक आहे. आपली आस्तिक बुद्धी व त्याग, आणि त्यांची कर्मकुशलता याचा समन्वय होऊनच खरा नवा सुसंस्कृत माणूस घडायला हवा.

श्रद्धा म्हणजे आंतरिक विश्वास, तर अश्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा. ती तामसी आहे. अश्रद्धेने फक्त भौतिक व वैषयिक भावना व वृत्ती बळावतात. तर श्रद्धावान, श्रद्धाशील व्यक्ति ही सदाचारसंपन्न, दान, संयम, त्याग, व्रत, परोपकार इत्यादी गुणांनी युक्त असते. श्रद्धाळू माणूस श्रद्धा असलेल्या वस्तूत कधीही, कसलाही, कोणताही दोष बघूच शकत नाही. दोष न पाहता गुण पाहण्याची वृत्ती वाढत गेल्याने माणूस सत्त्वशील व सदाचारी होतो. म्हणजे तो 'ऋत' व 'सत्'निष्ठ होतो. त्याच्यातील दैवी गुण वाढवणारी व त्याच्या अभ्युदयाची जननी 'श्रद्धा'च आहे.

श्री साईबाबांनी 'श्रद्धे'बरोबर 'सबुरी'ही सांगितली आहे. सबुरी म्हणजे स्वस्थ होऊन वाट पाहणे. धीर धरणे. स्वामी विवेकानंदही सांगतात, 'Have patience, infinite Patience and tremendous energy will come.' श्री साईबाबा सूत्ररुपाने हेच सांगत आहेत. 'श्रद्धा आणि सबुरी धरा, देव तुमचं भलं करील.' 'सबका मालिक एक' - 'एकं सत्'. 'सरळ मार्गाने चाला', 'कोणाला दुखवू नका त्याने मला दुखणे येते', 'कोणाची निंदा करू नका', 'कोणाला हिडीस-फिडीस करू नका', 'सर्वांभूती तोच भरलेला आहे', **'एकं सत्.'**

❖❖❖

# आदर्श साई प्रचारक

'श्री साईलीला'मधील आमच्या आवाहनास मान देऊन पुढील साईभक्तांनी पाच नवे वर्गणीदार आम्हास मिळवून दिले व साईविचार प्रसाराच्या कार्यात सक्रिय भाग घेतला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. सर्व साईभक्तांनी या सक्रिय साईभक्तांच्या सेवेचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून श्री साईलीला अवघ्या महाराष्ट्रात घरोघर जाण्याच्या दृष्टिने नवे नवे वर्गणीदार करून सहकार्य करावे ही विनंती.

(१) श्री. अशोक एम. चरडे, नेहरू नगर, नागपूर.
(२) श्री. दिपक दत्तात्रेय प्रधान, शिवाजी पथ, ठाणे (प).
(३) श्री. विनोद एस्. नेहते, सिन्नर
(४) श्री. द्वारिका मोहन मिश्रा, भुवनेश्वर (१० सभासद)
(५) श्री. धर्माजी मोतिराम पाटील, गडब, (२५ सभासद)
(६) श्री. वसंत मल्हारी नाशिककर, म्हसळा.
(७) श्री. पी. जी. देशपांडे, औरंगाबाद. (८ सभासद)
(८) श्री. प्रतिभा प्रभाकर देशपांडे, औरंगाबाद.
(९) श्री. लवू रामा गोवेकर, गोवा.
(१०) श्री. वसंत वासुदेवराव काठीवान, नागपूर.
(११) डॉ. पी.के. ओका, रोहा-रायगड.
(१२) डॉ. बाबू पुंडलिक बोईवड, तामसा.
(१३) श्री. पांडुरंग एस. खापर्डेकर, गोवा.
(१४) श्री. दत्तात्रय हणमंत देसाई, औरंगाबाद.
(१५) श्री. युवराज जी. शिंदे, कुसुंबा.
(१६) श्री. अरुण प्रभाकर देसाई, गोवा.
(१७) श्री. अनंतराव कापसे, नागपूर.
(१८) श्री. गुरुदास ग. कुडाळकर, गोवा.
(१९) श्री. विनायक भिकाजी डोंबले, मुंबई.
(२०) श्री. रविंद्र रामचंद्र कुपाडे, बुधगाव.
(२१) श्री. संतोष सुदाम जाधव, दादर.
(२२) श्री. संतोष मोहन चव्हाण, मुंबई.
(२३) श्री. योगेश आर. बासुतकर, मुंबई.
(२४) श्री. श्रीधर परशुराम शेनाई, गोवा.
(२५) श्री. भक्तवत्सल दत्ताराम नाईक, गोवा.
(२६) श्री. गंगाराम बापू मोरवसकर, मुंबई.
(२७) सौ. वंदना पां. गोकरणकर, मुंबई.
(२८) श्री. रमेश रघुनाथ बनकर, मुंबई. (६ सभासद)
(२९) श्री. रमाकांत श्रीपाद बोरकर, गोवा.

# महान साईभक्त : कृष्णराव भीष्म

– भालचंद्र भीष्म, नागपूर.



— ❖ ❖ ❖ —

**श्री साईबाबांच्या प्रमाणेच, त्यांचे भक्तही बाबांच्याच कृपेने महान झालेले होते. शामा, म्हाळसापती, दासगणू, हेमाडपंत आदी साईभक्तांच्या मांदियाळीमध्ये नागपूरचे स्वामी कृष्णानंद उर्फ कृष्णराव जागेश्वर भीष्म हेही एक अग्रणी साईभक्त होते.**

— ❖ ❖ ❖ —

स्वामी कृष्णानंद यांचें जीवनचरित्र थोडक्यांत असें आहे. जन्म इ.स. १८५४ मध्यें नागपूरजवळील बुटीबोरी येथें झाला. शालेय जीवन आटोपून वैवाहिक जीवनाला 'सुरूवात झाली व लवकरच प्रथम पत्नी निवर्तल्यामुळें त्यांनीं दुसरा विवाह केला. त्यांना चार अपत्यें झालीं. नंतर ती पत्नीही निवर्तली. तेव्हां त्यांना संसाराचाच उबग आला व त्या दु:खांत त्यांनीं आपल्या नोकरीचा, शेतीचा, घरादाराचा व आपल्या लहान मुलांचा त्याग केला. त्यावेळीं ते रेव्हिन्यू इन्स्पेक्टर होते. घरीं ९० एकर जमीन होती, (बुटीबोरी) मुलें फारच लहान होतीं. पण हृदय वैराग्यानीं भरलें असल्यामुळे लोभ जवळ येऊं शकत नव्हता व अशी कठीण परिस्थिति निर्माण करून निघून गेले.

त्यांनीं भगवी वस्त्रें परिधान करून आपल्या वैराग्यमय जीवनाला प्रारंभ केला. सदोदित हरिकिर्तन करावें, भजन

करावे व त्याचबरोबर राष्ट्रकार्य करण्याची सुद्धां लोकांत गोडी उत्पन्न करावी. असे जीवन त्यांनीं सुरू केलें. त्यांनीं यथार्थ रामायण, श्रीभगवत् गीता, श्रीसत्यनारायण, सात अध्यायी महिम्न वगैरे ग्रंथ मराठी-काव्यांत लिहून काढले. ऐतिहासिक आख्यानेंही लावून किर्तनें करीत. इ.स. १९१२ सालीं ते कै. दादासाहेब खापर्डे यांचेबरोबर शिरडीला गेले होते. त्यावेळीं शिरडी संस्थानांत रामजन्मोत्सवानिमित्त उरूस भरत असे. त्यांनीं तिथें स्वतः रामजन्मोत्सवानिमित्त व कृष्ण जन्मोत्सवानिमित्त कीर्तनें करण्याचा प्रघात पाडला. आजतागायत तो प्रकार चालू आहे. त्यांनीं लिहिलेल्या साईलिला या पुस्तिकेंतील पदें आजही आरतीच्या वेळीं म्हणण्यांत येतात.

त्यांनीं तत्कालीन राजकारणांवर व आध्यात्मिक विचारावर बरेच लेख लिहून ते पुरुषार्थ, सह्याद्री व वागीश्वरी या मासिकांतून प्रसिद्ध केले.

## समयावधान

एकदां ते कै. धर्मवीर डॉ. मुंजे यांचेकडे सकाळीं गेले असतां एक कठीण प्रसंग उद्‌भवला. कै. डॉ. मुंजे हे पूजा करण्यांत मग्न असतां एकाएकीं घराला पोलीसांचा गराडा पडला. डी.एस.पी. घरांत आले व घराची झडती घेण्याची परवानगी मागूं लागले. कारण १८५७ सालचे स्वातंत्र्य समर हे हस्तलिखित (सावरकरकृत) डॉ. कडे होते व पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वीच त्या पुस्तकावर बंदी होती. तेव्हा भीष्मांच्या हे ध्यानांत आलें. त्यांनीं घर झाडण्याचें निमित्त करून सर्व कचरा गोळा केला व त्या कचऱ्यांत ते पुस्तक टाकून कचऱ्यासकट पुस्तक म्युनिसिपालटीच्या कचरापेटींत टाकलें. डॉ. नीं पूजा संपवली. घर संशोधनाकरितां पोलिसांच्या स्वाधीन केलें, पुस्तक न मिळाल्यामुळें पोलीसांनीं डॉ. ची क्षमा मागितली. आल्या मार्गानें परत गेले. त्यांनीं आपल्या आयुष्याचा उर्वरीत काळ देशभक्त आप्पासाहेब हळदे यांच्या मुरलिधर मंदिरांत मोहपा येथें घालविला. मोहपा हे गांव सावनेर तहसिलींत असून नागपूरपासून २४ मैलावर आहे. गांवांत मंदिरापेक्षां साधुसंताच्या समाध्या फार आहेत. त्यांतच यांची पण समाधि देशभक्त आप्पासाहेब हळदे यांच्या माधवबागेंत मोहपा मुक्कामीं आहे. यांनीं स्वामीनीं त्यांना स्वप्नांत मंत्र दिला (वशिकावा) त्यात मंत्राचा जप ते सदैव करीत.

१९१६ सालीं मोहपा येथें अस्पृश्यता निवारण परिषद् भरलीं होती. व्याख्यान झालें. नंतर अस्पृश्यासह झालेल्या अल्पाहारास कोणी तयार नसतां भीष्म सर्वांसमोर झाले व अल्पाहार करण्यास बसले, गांवांतील लोकांनाही बसविलें. तें पाहून बाहेरगांवावरून आलेल्या प्रतिनिधींना फराळ करणें भाग पडलें. त्यामुळे गांवांतील लोक त्यांना राष्ट्रपुरुष मानूं लागले.

इ.स. १९२० सालची प्रत्यक्ष घडलेली घटना. कृष्णानंद एकादशीला मुरलीधर मंदिरांत कीर्तन करीत होते. कीर्तनांत पदें आळवित असतां त्यांची स्वर्गीय मातोश्री त्यांच्या समोर येऊन बसली, आईनीं दर्शन दिलें पण अर्ध्या पदांत बोलणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं तिच्याशीं भाषण केलें नाहीं. ती उठून मंदिरांत गेली. पद संपल्यावर हेही उठून मातोश्रीचे दर्शनास्तव मंदिरांत गेले पण भेट झाली नाहीं. फारच दुःखी झाले. तसेंच १९२३ सालीं देशभक्त आप्पासाहेब हळदे यांच्या निवडणुक प्रसंगीं उमरेड येथें कृष्णानंद व्याख्यान देण्याकरितां गेले. व्याख्यान झाल्यावर ते परत आल्यावर निवासस्थानीं मोहपा मुक्कामीं जाण्यास निघाले. बैलगाडींतून प्रवास सुरू होता. वाटेंत नदी आडवी आली. बैल नदींतून जाण्याकरितां तयार नव्हते. गाडी थांबल्यामुळें गाडीवानानें जोरांत तुतारी टोचली तो गाडीसकट बैलांनीं त्यापार उडी घेतली, तों समोर साईमहाराज उभे होते. त्यांचेजवळ पुष्कळ वेळ संभाषण केल्यावर पुढील मार्ग आक्रमून मुक्कामीं पोहोंचले.

त्यांनी सर्व हिंदुस्थानाचा प्रवास केला होता. १९३० सालीं त्यांनीं रामेश्वराचा सेतू काशीला व काशीचा रामेश्वरला पोहोंचवला, त्यांनीं चित्रकूट यात्रा केली. यात्रेवरुन ते १८-३-१९३३ सालीं परत आले, नंतर त्यांनीं २९-७-१९३४ रोजीं संन्यास ग्रहण केला, त्यावेळीं आचार्यत्व कै. वे. मू. सितारामपंत हेडगेवार यांचेकडे होतें.

## रसनेंद्रियांवर ताबा

त्यांनीं आपल्या जीवनांत रसनेंद्रियावर विजय मिळवला होता. १९२५ पासून जेवण अजिबात बंद केलें. फक्त श्री सच्चिदानंद स्वामींच्या उत्सवांतील द्वादशीला (मार्गशीर्ष) एक वाढ व एकदांच जेवण घेत असत. उपोषणसमयीं प्रथम वर्षी फक्त जलपानावर, द्वितीयवर्षी दुर्वा व बेल, तृतीयवर्षी लवंग व खडिसाखर, चतुर्थवर्षी गहु, तांदूळ, डाळ, एक छटाक मापाच्या वाटींत भिजत घालून खाणें. पंचमवर्षी कच्चे बेसन, शिंगाड्याचें पीठ-कणिक वगैरे भिजवून तिखट मीठ टाकून खाणें, सहावे वर्षी खारीक बदाम, सक्करपारा, सातवे वर्षी केळीं, संत्रीं, जांब, जांभूळ वगैरे व नंतर सकाळ व संध्याकाळ दूध घेणें.

त्यांच्या या उपोषणामुळें त्यांना एकदां शिक्षा झाली. ता. १६-७-१९३२ रोजीं त्यांना व्याख्यान दिल्यामुळें अटक करण्यांत आली. तेव्हां जेलमध्यें जेवण न करणें हा गुन्हा ठरत असे. त्यांनीं आपल्या नियमाप्रमाणें जेवण त्यागलें. त्यामुळें त्यांची गुन्हाखात्यात रवानगी करण्यांत आली. पण दुसरेच दिवशीं श्रेष्ठ पुढाऱ्यांच्या प्रयत्नामुळें त्यांची जामिनावर सुटका करण्यांत आली.

## राष्ट्रीय कार्य

त्यांचे त्यावेळीं देशांतील राष्ट्रीय पुढाऱ्यांशीं फारच घनिष्ट

संबंध होते. त्यांचे बैठकींत कधीं कधीं कै. विश्वनाथराव केळकर, कै. धर्मवीर डॉ. मुंजे, कै. गोपाळराव ओगले, कै. डॉ. हेडगेवार, कविवर्य आनन्दराव टेकाडे, देशभक्त आप्पासाहेब हळदे, इतिहास संशोधक दे. गो. लांडगे हे रहात असत. त्यांनीं लिहिलेल्या यथार्थ रामायणाचा भाग कांहीं जेष्ठ पुढाऱ्यांकडे वाचनास्तव गेल्यामुळें गहाळ झाला.

त्याचप्रमाणें हिंदु अनाथालयाचेंही कार्य करीत असत. हिंदुच्या ज्या मुली मुसलमानांचे घरांत गेल्या त्यांना पुन्हां आपल्या धर्मांत घेऊन त्यांचें हिंदूशीं लग्नें लावून देण्याचें कार्य करीत असत. त्यांनीं वेदाध्ययन केलें होतें.

एके दिवशीं संध्याकाळीं मी त्यांचे जवळ खेळत होतो. इतक्यांत कै. डॉ. हेडगेवार आले. तेव्हां मी बाजूला होऊन खेळूं लागलों. त्यांचे बोलणें आटोपल्यानंतर बाहेर जाण्यास्तव निघाले. मला पण येतोस कां ? म्हणून विचारलें. अर्थात् मी होकार दिला. बाहेर डॉ.ची मोटार होती. तींत बसून आम्ही रेशीमबाग ग्राऊन्डवर गेलों. ते दोघेही स्वयंसेवकाच्या मेळ्यांत सामील झाले. पण मी मात्र मोटारींतूनच गम्मत पाहात होतों. थोड्या वेळांत प्रार्थनेची वेळ झाली. तेव्हां हे स्वयंसेवकांच्या रांगेत उभे राहून प्रार्थना म्हणूं लागले. त्यांना आपल्या मोठेपणाचा यत्किंचितहि गर्व नव्हता.

त्यांनी लिहिलेली भक्तिपुरस्सर गीतें फारच सुंदर आहेत. आज मोहपा (मधुपुर) येथील प्रत्येक मंदिरांत भजनाचे वेळीं व उत्सव प्रसंगीं म्हणण्यांत येतात.

तेथील लोकांना त्यांचेविषयी फारच आदर असून त्यांचेविषयींच्या कथा डोळ्यांत पाणी आणून सांगतात. कारण कृष्णानन्द स्वामी हे प्रत्येकाला आपल्या घरांतील वडील पुरुष वाटतात. अशा या श्रेष्ठ पुरुषाचें प्राणोत्क्रमण ता. ८-८-१९३५ शनिवार रोजीं मोहपा (मधुपुर) मुक्कामीं झालें.

समाधि घेतल्यावर त्यांचेविषयीं दु:खोद्गार काढून केसरी, महाराष्ट्र, धर्मवीर या वर्तमान पत्रांनीं आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांचें एक गीत मोहप्यांतील (मधुपुरांतील) प्रत्येक अबालवृद्धांना पाठ असून ते चांगल्या आवाजांत म्हणत असतात.

## भीष्म रचित एक गीत

अनन्यभावे कर जोडूनिया विनवितो तुजला
राष्ट्रोन्नति कर साधन ब्रह्म द्या मम राष्ट्राला ॥१॥
वैदिक तेजस्विता ज्यामध्यें विप्र समुह देवा
आमुच्या तो राष्ट्रामध्यें जिकडे तिकडे निपजावा ॥२॥
शरसंधानी कुशल पराक्रमी क्षत्रिय तो निपजो
ज्या एकाचा विक्रम पाहूनि दशशतरथि लाजो ॥३॥
विपुल दुग्ध देणाऱ्या धेनू निपजो या राष्ट्री
तैसे बळकट वाहक होवो वृषभ धेनू जठरी ॥४॥
चपल अतिशय दारू निपजो या भूमी वरती
ज्या योगे श्री धनिगुरू खंदक नग लंघुनि वरती ॥५॥
इहपर सुखदा बुद्धि मती सती कुलयुग उद्धरती
निपजो आमुच्या राष्ट्री तैसे मिळविती विजय रथी ॥६॥
समाधीट हो तरुण आमुच्या राष्ट्रीं चोहीकडे
तव यजमाना वीर तनय हो ज्या भय कधिं न जडे ॥७॥
यथा काल धन वर्षो वारी ज्या भूमी वरती
सुपक्क होवो सस्यायुत ह्या औषधी सुफलवती ॥८॥
प्राप्त करू गत वैभव आम्ही योग हाचि लाभो,
कर गत वैभव रक्षक आम्हा क्षेम दक्ष लाहो ॥९॥
यजुगीते हो पूर्ण कामनर तैतरीय वदला,
अल्पमति तत्भाव कथुन कवि कृष्ण पदीं रमला ॥१०॥
अनन्य भावे कर जोडूनिया विनवितो तुजला,
राष्ट्रोन्नति कर साधन ब्रह्म द्या मम राष्ट्राला ॥११॥

**– भालचंद्र भीष्म**, नागपूर.

# दत्त जन्माच्या पुराणकथा

- गजानन कुलकर्णी



— ❖ ❖ ❖ —

**दत्त जन्मानिमित्त दत्त जन्माच्या पुराणकथांचा परामर्ष घेणारा हा लेख दत्तभक्तांना विशेष आवडेल असेवाटते. ब्रह्मा-विष्णू व महेश या तिन्ही देवांच्या भक्तांना दत्त देवता वंदनीय आहे कारण श्रीदत्तात्रय अवतार म्हणजे ब्रह्मा-विष्णू व महेशाचा महासमन्वय आहे.**

— ❖ ❖ ❖ —

बालार्कप्रभमिंद्रनील जटिलं भस्मांगरागोज्ज्वलं।
शांतं नादविलीनचित्तपवनं शार्दूलचर्माम्बरम्।
ब्रह्मज्ञैः सनकादिभिः परिवृतं सिद्धैः समाराधितं।
दत्तात्रेयमुपास्महे हृदि मुदा ध्येयं सदा योगिभिः।

वरील श्लोकाचा अर्थ आहे की, नुकत्याच उगवलेल्या सूर्यबिंबाप्रमाणे तेजस्वी, इंद्रनीलाप्रमाणे मस्तकी केश धारण करणारा, सर्वांगी भस्माची उटी माखलेला, अत्यंत शांत, मनरुपी पवनाच्या अनाहत ध्वनीमध्ये लय पावलेला, व्याघ्रचर्म पांघरलेला, सनकादी ब्रह्मवेत्त्यांनी वेढलेला, सिद्ध पुरुष. ज्याची सेवा करीत आहेत योगीजन सदोदित अत्यंत संतोषाने ज्यांचे ध्यान करतात, असा जो अत्रिपुत्र दत्त त्याची आम्ही

उपासना करतो. असा आहे.

सनातन हिंदू धर्मसंस्कृतीमध्ये प्राचीन कालापासून शिव, शक्ती, राम, श्रीदत्तात्रेयाचे स्थान ही अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. श्रीदत्त म्हणजे सत्व, रज आणि तमोगुणाचा एकत्रित संगम आहे. ब्रह्मा, विष्णू आणि महेशाचे ते एकत्र असं एकच रुप आहे. प्रापंचिक व्यक्तीला प्रपंच्यात राहून भक्तीच्या माध्यमातून मोक्ष साधायचा असेल तर त्या तीन्ही गुणांची कमीजास्त प्रमाणात आवश्यकता ही आहेच आहे. कोणताही एक गुण सोडून चालणारा नाही. त्यातून मोक्ष कसा साधायचा हे प्रत्येकाने ठरवायचं आहे. याची सतत जाणीव देणारं दत्त हे जागृत दैवत आहे. दत्त स्मर्तृगामी आहे. म्हणजे स्मरण करताच भक्तांच्या संकटात मदतीसाठी धावून येणारा देव आहे. तो अविनाशीआहे. म्हणून तर त्रेतायुगाच्या आधीपासून आजपर्यंत त्याच्या भक्तीचा महीमा त्रिखंडात निनादत आहे. आज कलियुगात तर दत्त हेच एकमेव दैवत आहे. घराघरात ते पूजलं जात आहे. याबाबतचा श्लोक असा आहे.

**कृते जनार्दनो देवस्त्रेताया रघुनंदन: ।**
**द्वापारे रामकृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभ: ॥**

वरील श्लोकावरुन सर्वांच्या एक गोष्ट लक्षात येईल की कलियुगात 'श्रीपाद श्रीवल्लभ' हे एकमेव दैवत मानलं गेलं आहे. प्रत्येक युगासाठी एक दैवत निश्चित केलेले असते तसे कलियुगासाठी **श्रीपाद श्रीवल्लभ**. म्हणजे कलियुगातला दत्तात्रेयाचा पहिला अवतार या युगाचे दैवत म्हणून निश्चित झालेले आहे. म्हणजेच कलियुगावर दत्तात्रेयांची अनिर्बंध सत्ता आहे. दत्तभक्तीत लीन होणारा प्रत्येक जीव इथे निश्चितपणे भवसागर तरुन जाणार आहे. हे नियतीचे अलिखीत आश्वासन आहे. म्हणूनच आज घराघरातून दत्तभक्तीचा महीमा अपरंपार वाढलेला आपणास पहायला मिळत आहे.

## पुराणांतील दत्तजन्मकथा

दत्तजन्मासंबंधी नारदपुराण, वायुपुराण, कुर्मपुराण, विष्णूपुराण, मार्कण्डेयपुराण, धर्मोत्तरपुराण, पद्मपुराण अशा विविध पुराणातून थोड्या फार फरकाने दत्तजन्म कथेसंबंधी संदर्भ आलेले पहावयास मिळतात. परंतु या सर्व पुराणकथांमध्ये आपल्या परिचित असलेली दत्त जन्मकथाआहे ती म्हणजे नारदपुराणातली. नारदपुराणाच्या तिसऱ्या अध्यायात ही कथा सविस्तर आली आहे ती अशी.

सह्याद्रि पर्वतावर महात्पस्वी तपोनिधी अत्रि मुनी पर्णकुटी बांधून रहात होते. त्यांच्या पर्णकुटीमोवतालचा परिसर किंवा प्रदेश अतिशय रमणिक होता. उत्फुल्लपणानं बहरलेली वृक्षराजी, त्यावर मधुरगान करणारे विविध प्रकारचे द्विजराज. त्यांच्या त्या मधुरगानाला सुस्वर स्वरात साथ देणारा ऋचा आणि सूक्त गाणारा सुज्ञ ब्रह्मवृंद, सुमधुर सुवासिक पुष्पांनी लहडलेल्या मनोरम वेली आणि रसाळ अमृतमयी फळांनी लहडलेले वृक्ष. कलकल कलरव करीत वाहणारे निर्मळ स्फटीकांचे झरे आणि या वातावरणात अल्लडपणानं विहार करणारी मनमोही मृगशावकं.

अशा या रमणीय परिसरात आपला आश्रम थाटून अत्रीऋषी आपल्या पत्नीसमवेत महापतिव्रता देवी अनसूयेसमवेत कठोर तपाचरण करीत कालक्रमणा करीत होते. या ऋषींचा एक दंडक होता की त्यांच्या दारी आलेला याचक कधी विन्मुख जात नसे.

महापतिव्रता देवी अनसूयेच्या सतीत्वाचा आणि पातिव्रत्याचा डंका त्रिभूवनी गाजत होता. नारदाकरवी देवी अनसूयेच्या पातिव्रत्याची ही कथा स्वर्गात लक्ष्मी, पार्वती आणि सावित्री या तीन महादेवींच्या कानी पडली. नारदांनी ही हकीकत जरा तिखटमीठ लावून या तिघींचा अहंकार डिवचला जाईल अशीच सांगितली. तिघींच्याही अंगाचा तिळपापड झाला; आणि सती अनसूयेचे सत्व हरण करण्याविषयी तिघींनीही आपापल्या पतीराजांकडे हट्ट धरला.

स्त्रीहट्ट, राजहट्ट आणि बालहट्ट हे तीनही हट्ट फार वाईट असं म्हटलं जातं. कारण हे तीघेही आपला हट्ट पूर्ण झाल्याशिवाय शांतच होत नाहीत हा त्रिखंडातला अनुभव. आपल्या हट्टाचे परिणाम काय होतील याची यापैकी एकालाही तमा नसते. तीन देवींच्या ह्या हट्टापुढे अखेर तीनही महादेवांनी हात टेकले आणि त्यांचे म्हणणे मान्य केले.

ठरल्याप्रमाणे तीनही महादेवांनी ब्रह्मा-विष्णू-महेशानी एका सुवेळी सुमुहुर्ती, सुप्रभाती बैरागी वेश धारण केले आणि सह्याद्रि पर्वतावरील अत्रि ऋषींच्या कुटीपाशी येऊन प्रगट झाले. वेळ सकाळची होती. अत्रिऋषी स्नानासाठी नदीवर गेले होते. आश्रमात माता अनसूया एकटीच होती. तिनही देव आश्रमापाशी उभे राहीले आणि तिघांनी एकाचवेळी पुकारा केला ''ॐ भवति भिक्षां देहि''

अतिथींची हाक ऐकून सती अनसूया शिधा घेऊन बाहेर आली. परंतु ती भिक्षा घेण्याचे नाकारून ह्या तिन्ही साधूंनी माता अनसूयेकडे नग्न भोजन वाढण्याची मागणी केली. त्यांची ही मागणी ऐकून अनसूया चपापली आणि मनोमनी समजून चुकली की हे तीन साधू कोणी सामान्य अतिथी नव्हेत. यांची मागणीही विचित्र आहे; ती कशी पूरी करणार ? अत्रि ऋषींही कुटीत नाहीत अशावेळी यांना परत पाठवावे तरी सत्व जाते. काय करावे या विचारात ती पडली. इतक्यात तिला युक्ती

सुचली. तिने आपल्या पतीचे स्मरण करून त्यांनी अभिमंत्रून ठेवलेले तीर्थ त्या तिघांच्या अंगावर शिंपडले. त्याबरोबर ते तीनही महादेव तान्ही बालके होऊन जमिनीवर लोळू लागली. मग त्या बाळांना अनसूयेने उचलून घेऊन नग्न होऊन स्तनपान करविले आणि त्यांची इच्छा पूर्ण केली. हाच दत्तावतार अशी ही थोडक्यात कथा आहे. आणि आज ती वर्षानुवर्ष चालत आल्याने सर्वांच्या परिचयाची आहे.

## भागवतपुराणातील कथा

नारदपुराणातील सर्वपरिचित असलेल्या या कथेसारखीच या कथेशी थोडेफार साम्य असलेली दत्तजन्माची एक कथा भागवतपुराणात पहायला मिळते. ती थोडक्यात अशी आहे.



अत्रीऋषी हे ब्रह्मज्ञानी पुरुषात श्रेष्ठ होते. ब्रह्मदेवाच्या सात मानसपूत्रांपैकी ते एक होते. ब्रह्मदेवाने त्यांना सृष्टी उत्पन्न करण्याची प्रेरणा दिली. तेव्हा तपश्चर्या करण्यासाठी ते आपल्या पत्नीसह वर्तमान ऋक्ष पर्वतावर गेले. त्या पर्वतावरील अरण्यात पुष्पगुच्छांनी भरलेले अनेक पळसाचे व अशोकाचे वृक्ष असून त्यातूनच निर्विन्ध्या नावाची नदी वहात होती. तिच्या उदकाचा नाद सर्वत्र घुमत होता. त्या अरण्यात सुखदु:खादी द्वंद्वाचा त्याग करून अत्रि केवळ वायू भक्षण करीत व प्राणायामाच्या योगाने आपल्या मनाचा निग्रह करीत शंभर वर्षेपर्यंत एका पायावर उभे राहून तपश्चर्या करीत होते. ही कडक तपश्चर्या करीत असताना अत्रीऋषी, जो कोणी या जगाचा नियंता आहे, त्यालाच मी शरण आलो आहे, तरी त्याने मला आपल्यासारखी संतती द्यावी असे नित्य चिंतन करीत असत.

अत्रींची तपश्चर्या चालू असताना प्राणायामरुपी इंधनाने प्रदीप्त झालेला अग्नी त्यांच्या मस्तकातून बाहेर पडून त्रैलोक्याला जाळऊ लागला, तेव्हा अप्सरा, ऋषी, गंधर्व, सिद्ध, विद्याधर व सर्प हे ज्यांच्या किर्तीचे वर्णन करीत असतात असे ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन महादेव अत्रीऋषींच्या आश्रमात आले. नंदी, हंस व गरुड या वाहनावर बसून आलेल्या व त्रिशूळ, कमंडलू व चक्र अशी आयुधे धारण करणाऱ्या या तीन देवांनी अत्रींना साष्टांग नमस्कार घातला. त्यांची मनोभावे पूजा केली; आणि आम्हाला का बोलावले म्हणून विचारले.

अत्रीऋषींनी या तिघांची मनोभावे प्रार्थना करून म्हटले. 'देवहो, जगाची उत्पत्ती, पालन व संहार अशी कामे करणारे तुम्ही तीन महादेव आहात. तुमच्यापैकी ज्या एकालाच मी बोलावले होते तो कोण ? मी येथे पुत्रप्राप्तीसाठी तप करीत आहे.' त्यावर त्या तीन देवांनी अत्रिंना सांगितले, 'तू ज्या एका तत्वाचे ध्यान करीत आहेस त्याचेच आम्ही तिघेजण अंशभूत आहोत. ऋषे तुझे कल्याण असो. आता तुला आमच्या अंशापासून जगप्रख्यात असे तीन पुत्र होतील आणि ते अशी किर्ती जगभर पसरवतील.' त्यानंतर वरप्राप्तीप्रमाणे अत्रिऋषींना ब्रह्मदेवाच्या अंशापासून सोम, विष्णूच्या अंशापासून योगशास्त्रात निपुण असा दत्त आणि श्रीशंकराच्या अंशापासून दूर्वास असे तीन पूत्र झाले. (भागवतपुराण ४.१.१७-३२)

पहिल्या कथेतील आणि दुसऱ्या कथेतील मिमांसा तुमच्या लक्षात आली असेल. आता गुरुचरित्राकडे वळू. आज वर्षानुवर्षे दत्तसंप्रदायिकांना प्रमाणभूत वाटत असलेला एकमेव ग्रंथ म्हणजे गुरुचरित्राचा निर्देश करण्यात येतो. या गुरुचरित्राच्या चौथ्या अध्यायात दत्त जन्मकथा चितारण्यात आलेली आहे. या लेखाच्या आरंभीच लिहीलेली नारदपुराण किंवा दत्तप्रबोधातली कथा आणि गुरुचरित्राच्या चौथ्या अध्यायातील कथा जवळजवळ सारखीच आहे. तीन देवांच्या तीन वेगवेगळ्या वरापासून चंद्र, दत्त आणि दूर्वास असे तीन पुत्र झाल्याचा हा उल्लेख आहे. इथे श्रीदत्त हे एकमुखीच दैवत आहे, त्रिमुखी नव्हे. त्रैमूर्ती दत्तध्यानाची कल्पना नंतर रुजली आहे. असो. आजचा आपला हा विषय नही. या विषयावर नंतर कधीतरी विवेचनात्मक लेख लिहू. आज आपण निरनिराळ्या पुराणकथांमधून आलेल्या फक्त दत्त जन्मकथांचाच परामर्ष या लेखात घेणार आहोत.

ब्रह्मपुराणात थोडी निराळी कथा आहे. ब्रह्मा-विष्णू-महेश यांची पूत्रप्राप्तीसाठी अत्रिऋषी आराधना करीत होते. त्यांना हे तीनही देव प्रसन्न झाले आणि वर माग असे सांगितले. त्यावर अत्रिऋषी म्हणाले, 'आपण माझ्या घरी पुत्ररुपाने जन्म घ्यावा आणि एक गुणवती व रुपवती कन्यापण द्यावी.' देवांनी 'तथास्तु' म्हटलं. देवांच्या आशिर्वादाने अत्रिंना दत्तात्रेय, सोम व दुर्वास असे तीन पुत्र झाले आणि एक कन्याही झाली. तिचे नाव 'शुभात्रेयी' (१४४.२-४)

वायुपुराण वा कुर्मपुराणात अनसूयेच्या सतीत्वाशी व

पावित्र्याशी संबंध असलेली एक कथा आहे. ती अशी, प्रतिष्ठान नगरीत कौशिक नावाचा एक ब्राह्मण नित्य वेश्यागमनी असल्यामुळे त्यास आपल्या पत्नीची बिलकूल चाड उरली नव्हती. काही काळानंतर त्यास रोग जडून त्याची गात्रे झडू लागली. वेश्येने त्याचा त्याग केल्यावर तो घरी राहू लागला. त्याच्या साध्वी पत्नीने त्याची मनोभावे सेवा केली. एकदा हा रोगी पती आपल्या पत्नीस म्हणाला, 'मला त्या वेश्येवाचून राहवत नाही. तू मला तिच्याकडे घेऊन चल.' रात्रीच्या अंधारात कौशिकपत्नी आपल्या पतीला घेऊन वेश्येकडे निघाली.

वाटेत एक चमत्कार घडला. त्याच नगरात चुकीने चोर समजून सुळी दिलेल्या मांडव्य ऋषी सुळावर यातना भोगीत होता. या ऋषीला कौशिकाचा धक्का बसला. त्याबरोबर मांडव्याने कौशिकाला शाप दिला की, 'तू सूर्योदयापूर्वी मरण पावशील.' परंतु आपल्या पातिव्रत्याच्या प्रभावाने कौशिकपत्नीने सूर्योदयच थांबविला. त्यामुळे सबंध विश्वचक्रातच बिघाड उत्पन्न झाला. सर्व देव घाबरून गेले. विश्वाला वाचविण्यासाठी ब्रह्मदेवाने सती अनसूयेकडे मध्यस्थी करण्यासाठी विनंती केली. अनसूयेने कौशिकपत्नीस अभय देऊन सूर्योदय घडवून आणला. मांडव्याच्या शापामुळे मृत झालेला कौशिक पुन: जिवंत झाला. अनसूयेवर सर्व देव प्रसन्न झाले आणि त्यांनी तिला आशिर्वाद दिला, 'तुझ्या पोटी तीन देव जन्म घेतील.' मार्कण्डेयपुराणातही अशीच कथा आहे.

## कथांचा अन्वयार्थ

या कथांचा अन्वयार्थ शोधताना अध्यात्मिक अर्थाची एक मनोरम दिशा पाहण्यासारखी आहे. ब्रह्मा, विष्णू व महेश हे तीन देव समर्थ खरे. सर्व ऐश्वर्याचे भोग घेणारे, सृष्टीचा व्याप सांभाळणारे. परंतु मनात तिघेही कोठेतरी अस्वस्थ होते. कोणालाही समाधान नव्हते. सावित्री, रमा, उमा यांचा सहवासही अपुरा वाटावा इतीक बेचैनी तिघांच्याही मनी होती. आईच्या प्रेमाचा, वात्सल्याचा अनुभव त्यांना नव्हता. त्यासाठी ते आसुसले होते. सती अनसूयेएवढी थोर पतिव्रता माता म्हणून लागली तर? या एका प्रश्नाने ते अधीर बनले. वात्सल्याच्या सुखाचा अनुभव घेण्यासाठी ते वेडावले. याच कल्पनेचा विस्तार वरील कथांमधून विस्ताराने आलेला आपल्याला दिसतो. वात्सल्याच्या अनुभूतीसाठी जन्म घेणे आणि मातेच्या दुधावर पुष्ट होऊन जगदोद्धार करणे याची देवांनाही भूक होती. ब्रह्मा-विष्णू-महेश यासाठीच बालक बनले. हे दूध पिऊन संतुष्ट झाले आणि अनसूयामाता त्यांना दूध पाजून संतुष्ट झाली.

आता ज्या महान विभूतींच्या पोटी म्हणजे अत्रि-अनसूयेच्या पोटी या तीन महादेवांनी जन्म घेतला. म्हणजे मानवी रुपात जन्म घेण्यासाठी योय मानलं त्यांची योग्यता थोडक्यात आपण जाणून घेतलीच पाहिजे असं नाही वाटत तुम्हांला ? वाटतं ना ? मग आपण प्रथम तेच करु या आणि मग श्रीदत्तात्रेय या महान देवतेच्या प्राचीनतेकडे वळू.

## दत्तदेवतेची प्राचीनता

अत्रिऋषींना जगद्गुरु दत्तात्रेयाच पिता म्हणून ओळखले जाते. या अत्रिऋषींचा उल्लेख ऋग्वेदातील पाचव्या मंडलात येतो. यातील ३७-४३ व ७६-७७ ही सूक्ते याच्याच नावावर आहेत. याच्या जन्मकथेसंबंधी हकीकत अशी मिळते. प्रजापतीने त्रिसंवत्सर नावाचे एक सत्र आरंभिले होते. या सत्रात वाग्देवी प्रकट झाली. तिला पाहून प्रजापति व वरुण यांचे मन चलीत झाले. त्या दोघांचे पतन पावलेले वीर्य वायूने अग्नीत टाकले. या अग्निज्वालेपासून भृगू निखाऱ्यापासून अंगिरा ऋषी जन्मास आले. या दोन सुंदर मुलांना पाहून वाग्देवीने प्रजापतिकडून आणखी एका मुलाची इच्छा केली. प्रजापतिच्या वीर्यापासून प्रतिसूर्य असा एक पुत्र निर्माण झाला, तो अत्रि होय.

अत्रिसंबंधी आणखी एक कथा आहे की, स्वायंभुव मन्वंतरात ब्रह्मदेवाच्या नेत्रापासून वा मस्तकापासून झालेला पुत्र म्हणजे अत्रि होय. ब्रह्मदेवच्या दहा मानसपुत्रांपैकी याला एक मानतात. कर्दम प्रजापतींची अनसूया नावाची जी कन्या ती अत्रिंची भार्या होय. या अत्रिऋषींनी चतुरात्र नावाचा एक याग सुरु केल्याचा पुरावा सापडतो. ऋग्वेदातील पर्जन्यसूक्त अत्रिंच्या नावाने ओळखले जाते. अत्रि हा सप्तर्षींपैकी एक म्हणून मोठा कर्मनिष्ठ व तेजस्वी असा गणला गेला आहे. याला अनसूयेपासन दत्त, दूर्वास, सोम व आर्यमा असे चार पुत्र व अमला नावाची पुत्री झाल्याचा उल्लेख आला आहे.

कर्दम प्रजापती नावाच्या महर्षींची कन्या अनसूया या तपोनिधी तेजस्वी अशा अत्रिऋषींची पत्नी असल्याचा उल्लेख वर आला आहे. परंतु तेव्हढ्याने आपलं समाधान होणारे नाही. माता अनसूयेची थोडीअधिक ओळख व्हायलाच हवी. पौराणिक वाङ्मयात एक थोर पतिव्रता म्हणून अनसूयेचा उल्लेख वारंवार आला आहे. न खातापिता तीनशे वर्षे तपश्चर्या करून हिने शंकराला प्रसन्न करून घेतले होते. एकदा दहा वर्षे सतत दुष्काळ पडल्याने लोक त्रस्त झाले होते. त्यावेळी हिने स्वत:च्या तपसामर्थ्यावर जोरावर स्वर्गातून गंगा आणली व

दुष्काळाचे निवारण केले. अशातऱ्हेची कथा हिच्यासंबंधी सांगण्यात येते.

अशा या महान तपोनिष्ठ विभूतींना आपले मातापिता म्हणून ब्रह्म-विष्णू-महेश यांनी निवडावे यात काहीच नवल नाही. या दोघांचे म्हणजे अत्रि अनसूयेचे भाग्य थोर म्हणून तीन महादेव त्यांचे पोटी अवतीर्ण झाले असे म्हणण्यापेक्षा या तीन महादेवांचे भाग्य थोर म्हणून त्यांना बालस्वरुप धरण्याची इच्छा होताच असे मातापिता मिळाले असे म्हणणेच अधिक योग्य होईल असं मला वाटतं.

श्रीराम वनवासात असताना सीतेसह तपोनिधी अत्रिऋषींच्या आश्रमात आला होता असा उल्लेख (वा.रा. २-११७-२१) मध्ये आला आहे. श्रीराम आश्रमात आल्यानंतर अत्रिच्या सुचनेवरून सीतेस अनसूयेच्या दर्शनास जाण्याबाबत श्रीरामाने तिला सांगितले. अनसूया सीतेची भेट झाली. तेव्हा माता अनसूया वार्धक्याकडे पूर्ण झुकली होती. तिची सर्व गात्र शिथिल झाली होती. अंगावर सुरकुत्या पडल्या होत्या. केस पांढरे झाले होते. वाऱ्याने हलणाऱ्या केळीप्रमाणे तीची अवस्था बनली होती. पतीबरोबर वनवासास निघालेली सीता पाहून अनसूयेला तिचा मोठा अभिमान वाटला. तिने सीतेची प्रशंसा केली. नेहमी ताजी राहणारी माळ, वस्त्र, भूषण, उटी, अनुलेपन इत्यादि वस्तू समर्पण करून तिच्याशी प्रेमाच्या गोष्टी केल्या.

या सीता अनसूया संभाषणात माता अनसूयेने सीतेला जो उपदेश केला त्यामधून भारतीय नारीच्या सतीत्वाचा आणि पातिव्रत्याचा मनोज्ञ आदर्श तिने सीतेपुढे ठेवल्याचे दिसून येते. अनसूया माता सीतेला म्हणाली.

सीते, धर्माकडे तुझे लक्ष आहे हे सुदैवच होय. मानिनी नगरात असो या वनात असो, अनुकूल असो वा प्रतिकूल असो. ज्या स्त्रियांना भर्ताप्रिय आहे, त्यांना महाफलदायक लोक प्राप्त होतात. पती दु:शील असो, स्वेच्छाचारी असो, निर्धन असो, सुस्वभावी स्त्रियांचे तेच मुख्य दैवत आहे. सीते भर्त्यापेक्षा इष्ट बांधव मुल दुसरे कोणीच नाहीत. भर्ताच इहलोकी व परलोकी इष्टप्राप्तीचे साधन असल्यामुळे सेवेस योग्य आहे. सीते, ही दिव्यमाला, वस्त्र, भूषणे, उटी, मोठे मूल्यवान अनुलेपन मी तुला देते. तुझ्याअवयवांना या गोष्टी शोभतील. या दिव्य उटीने जनककन्ये, विष्णूला शोभणाऱ्या लक्ष्मीप्रमाणे तू आपल्या भर्त्याला शोभशील. सीतेचा याप्रमाणे यथोचित सत्कार करून अनसूयेने तिला सतीच्या धर्माचा उपदेश करताना म्हटले.

**नगरस्थो वनस्थो वा शुभो वा यदि वाऽशुभः ।**
**यासां स्त्रीणां प्रियो भर्ता तासां लोका महोदयः ।**

नगरात राहणारा वा वनवासी, अनुकूल वा प्रतिकूल, कसाही असो, आपला पती ज्या स्त्रियांनी प्रिय मानला त्यांना प्रकाशित असे परलोक प्राप्त होतात. अशातऱ्हेचा माता अनसूयेचा उपदेश ऐकून आणि आशीर्वाद घेऊन श्रीराम सीतेसह वर्तमान पुढे निघाले.

श्रीरामावतार म्हणजे महाविष्णूचा ७वा अवतार त्रेतायुगाच्या तिसऱ्या चरणातला अवतार आहे. त्रेता युगानंतर द्वापारयुग संपले आणि सद्यस्थितीत तर कलियुग सुरु असून कलियुगाचीही ५०८५ वर्ष संपली आहेत. रामअवतारापूर्वीच श्रीदत्तात्रेयांचा अवतार झाला आहे. म्हणजे श्रीदत्त हे दैवत किती प्राचीन काळापासून आमच्या संस्कृतीमध्ये स्थित आहे हे प्रत्येकाने लक्षात घ्यावे हाच माझा या विवेचनामागे मूळ उद्देश आहे.

श्रीदत्तावतार हा रामावताराआधीचाच अवतार आहे असे नव्हे तर हा अवतार त्याही आधीचा असावा असे दिसते कारण श्रीरामावताराआधीचा अवतार परशुराम अवतार आहे. या परशुरामाला श्रीदत्तात्रेयांनी उपदेश केला असल्याचा उल्लेख प्राचीन ग्रंथात सापडतो. शिवपुराण, शतरुद्रसंहिता, विष्णूधर्मोत्तरपुराण, विष्णुपुराण, वायुपुराण, ब्रह्मपुराण, ब्रह्माण्डपुराण, कुमपुराण, मार्कण्डेयपुराण अशा विविध पुराणातून श्रीदत्तात्रेयांचे उल्लेख आले आहेत. श्रीदत्तात्रेयांनी सहस्त्रार्जुनास उपदेश केल्याचा उल्लेख महाभारताच्या वनपर्वात (११५-१२), शांतिपर्वात (४९.३६.३७), अनुशासनपर्वात (१५२.५ व १५३.१२) आलेले आहेत. सहस्त्रार्जुनाचा काळ हा जमदग्नी परशुरामाच्या संदर्भातला महत्त्वाचा मानला पाहिजे. कारण परशुराम हा श्रीराम, श्रीकृष्ण यांच्याही आधीचा अवतार म्हणजे सहावा अवतार आहे. या परशुरामाच्या मातापित्यावर दहनसंकार माहूर येथे श्रीदत्तात्रेयांच्या पौरोहित्याखाली झाल्याची कथा सर्वत्र मिळते. मग श्रीदत्तात्रेयांची प्राचीनता शोधण्यासाठी आपल्याला अधिक पुरावे शोधायची गरजच काय ?

असा हा युगानयुगे आपल्या भक्तांचे कल्याण करीत असलेला श्रीदत्त हे अविनाशी सगुणरुप आजही केवळ स्मरणमात्रे आपल्या भक्ताच्या हाकेला तात्काळ साद देत असल्याचा अनुभव सद्भक्तांना येत आहे आणि यापुढेही तो असाच येत राहील यात तिळमात्र शंका नाही.

❖ ❖ ❖

# साई वंदना



## श्री साई

तुझ्या आरतीची धून वाहे चराचरातून
तुझ्या नामाचा गजर भिने रोमरोमातून ॥

तुला म्हणालेत वेडा
तेच होते ठार वेडे
तुला समजण्यासाठी
दिस लागले केवढे

तुझी बांधिली मंदीरे त्यांनी तुझियामागून
तुझ्या नामाचा गजर भिने रोमरोमांतून ॥१॥

तुझ्या आयुष्याचा यज्ञ
चमत्कार हे साधन
तुझ्या कर्माच्या समिधा
सदा पडल्या त्यातून

दीप पेटले पाण्याने तुझ्या नजरेमधून
तुझ्या नामाचा गजर भिने रोमरोमातून ॥२॥

तुझी अपार रे माया
तुझी अगाध रे लीला

तुझा वाटतो आधार
सदा गांजल्या जीवाला
जो जो तुझ्या पायी आला, गेला सुखाने न्हाऊन
तुझ्या नामाचा गजर भिने रोमरोमांतून ॥३॥
नाही लौकिकाचा सोस
नाही भौतिकाची आस

तुझ्या कृपेचा प्रसाद
लाभो एवढाच ध्यास
तुझा असावा निवास, सदा माझ्या मनातून
तुझ्या नामाचा गजर भिने रोमरोमांतून ॥४॥

प्रसाद कुलकर्णी
गोरेगाव, मुंबई.

# श्री गिरनार महिमाष्टक

पदयात्रा अन् तीर्थयात्रा, छंद मम आगळा
छंदापोटी पहा मी पाहिला, गिरनार वेगळा
दत्तगुरुंचे पवित्र स्थान ते, भूरळ मनाला कुणाहि पडते
मनास पडतां भूरळ आमुच्या, दत्त गीत मग स्फुरते ॥१॥

कितीक पाहिले गड चखोट मी, परि न देखिला असा
अती अवघड अन् चढण्यालाहि, दुर्गम गड हा कसा
खालून जाता नजर आपुली, नजीक भासतो, नजीक असा
वळूनि वळूनि दूर जातो, पहा फसवितो कसा ॥२॥

कशी तरी तुम्हीं जाल चालूनि, अवड वाट ही अशी
अंबाजीचे मंदीर येता, जोरदार मग वारा पाहुनि, गाळण उडेल कशी
वारा वाहे जोरदार जो, उडती माणसे पहा कशी
भिरभिर गिरक्या घेऊनि, उडती पाने तशी ॥३॥

तुम्हास लागते जावे तेथे, सांभाळून बहू अती
नजर जराशी चुकता तुमची होईल मग गच्छंती
मनात तुमच्या असेल जरी ती, श्रद्धा, सबुरी तेव्हां
जाल तुम्ही गड तो चढुनि, कळणारहि नाही तुम्हां ॥४॥

अंबाजीचे मंदीर येता, सुसाट वारा तिथे पाहतां
घाबरून मग तुम्हीहि जाता, मना लागते एक चिंता
होईल कां हो सफल यात्रा, मनास तुम्ही मग पुसता
भावभक्तिचा मी रे भुकेला, या, या, म्हणतो दत्ता ॥५॥

मनास तुमच्या हुरूप येतो, पळून जाते सारी चिंता
दत्तप्रभूंच्या कृपाप्रसादे, सफल होई मग यात्रा
तुझा कळेना अंत कुणाला, मनात तुम्ही म्हणता
नमस्कार मग करुनि तयांना, पूर्ण करा तुम्ही यात्रा ॥६॥

दत्त, दत्त, तुम्ही वदतां वाचे, अवचित पुढे ठाकते
मनीं वसे जे, जे जे तुमच्या, पूर्णचि मग ते होते
'दत्त' म्हणजे देणारा तो, भक्तांचा तो दाता
'दत्तप्रभू'हि एकच आहे, आहे तुमचा त्राता ॥७॥

अतिपावन गड गिरनार आहे, दत्तगुरुंचे स्थान
सर्वांमध्ये आहे एक ते, आहे तीर्थ स्थान
'दत्तगुरु' ते तिथेच वसती, त्यांचे वसती स्थान
पादुका त्या निर्गुण असती, अति महान स्थान ॥८॥

गंगाधरसुत
ठाणे.

# हाची वर देई

आवडीने भावे, नांव तुझे घ्यावे
सदा तुला स्मरावे, साईनाथा ॥१॥
जीवाचा सकळ, करिसी सांभाळ
तूच तू दयाळ, साईनाथा ॥२॥
या तुझीया चित्ती, राहो माझी मती
करितो विनंती, साईनाथा ॥३॥
न मथुरा काशी; नको वाराणशी
तूच तू आम्हासी, साईनाथा ॥४॥
सदा ध्यानी मनी, तुझ्याच चरणी
देह माझा जाणी, साईनाथा ॥५॥
नाम तुझे साई वसो माझे देही
हाची वर देई; साईनाथा ॥६॥

एम. के. मुम्मलवार
नांदेड.

# राजापूरची पावनगंगा

– मधुसुदन सामंत (तेरावळेकर), मराठी साहित्य प्राज्ञ



मी पाहिलेल्या तीर्थक्षेत्रांत राजापूरची पावनगंगा हे माझे अत्यंत आवडते तीर्थक्षेत्र आहे.अगदी नास्तिक मतवादी जरी माणूस असला तरी या तीर्थक्षेत्राच्या दर्शनाने आणि स्नानाने त्याची मति गुंग होऊन तो आपोआप अस्तिक्य भावनेचा होईल. कारण राजापूरची गंगा ही ईश्वराच्या सृष्टीमधील चमत्कारांपैकी एक अनाकलनीय असा एक अद्‌भुत चमत्कार आहे. कारण गंगेचे येणे अगर जाणे याची वास्तपुस्त अगोदर कोणालाहि नसते तसेच तिचे आगमन अगर लुप्त होणे याला वेळेचे बंधनहि नाही. या ठिकाणी अंधश्रद्धा निर्मुलनवाले किंवा विज्ञानप्रणेते शास्त्रज्ञ यांच्या कसोटया अगर नियम मुळीच लागू पडणार नाहीत.

आजच्या रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिणेस राजापूर तालुका आहे. देवदेवतार्चन, मंत्रतंत्र व याज्ञकी जाणणारे लोक या तालुक्यात अनेक होऊन गेले. राजापूरची पेठ पूर्वी खूप ऐतिहासिक महत्त्व असलेली आहे. शिवाय व्यापारी महत्त्वही या पेठेला असामान्य होते.

इंग्रज, फ्रेंच, डच इत्यादी परकीय लोकांनी या ठिकाणी वखारी बांधून अरबस्तान, आफ्रिका यासारख्या दूरदूरच्या देशांशी व्यापारी संबंध वाढवले.

तांब्या पितळेची सुबक घाटाची राजापूरी भांडी पूर्वी फार प्रसिद्ध होती. कडू, पेणकर इत्यादी दुकानदारांत भांडयांची विक्री आणि जाहिरात यांची अहमहमिकाच लागलेली असायची.

डोंगर-टेकडयांच्या या गावात गंगा अवतीर्ण झाली हे राजापूरकर मंडळींचे महद्‌भाग्य होय! राजापूरच्या आग्नेय दिशेस गंगामाईचे स्थान नयनरम्य आणि मनोहर अशा ठिकाणी वसले आहे. गंगेच्या स्थानावर जाण्यासाठी चढण असून उन्हाळ्यापासून गंगेच्या स्थानापर्यंत जांभ्या दगडाच्या पायऱ्यांनी बांधलेला सुंदर मार्ग आहे. गंगेवर गंगास्नानासाठी जाताना राजापूरच्या नदीच्याकाठी गरम पाण्याचे झरे असून त्या ठिकाणी आंघोळ करून यात्रेकरूंनी ओलेत्यांनी गंगेच्या स्थानावर जाण्याचा प्रघात आहे.

या गरम पाण्याची आंघोळ केल्याने त्वचारोग आणि संधीवात बरे होतात. या झऱ्याचे पाणी गंधकयुक्त असल्याने भूक सपाटून लागते. या ज्वालाकुंडाचे पाणी अविरत आणि अव्याहत वर्षाचे बाराही महिने वाहात असते.

## १४ स्नान कुंडे

गंगा स्थानावर एकूण चौदा कुंडे आहेत. काशीकुंड आणि इतर कुंडे काळ्या दगडांनी बांधून काढली आहेत. मूळ गंगाकुंड एका सव्वा फूट औरस चौरस असून त्या ठिकाणी प्रथम गंगेचे आगमन होते असे म्हणतात.

काशीकुंड हे कुंड हे दोन सव्वादोन मीटर खोल असून सुमारे एक मीटर चौरस आहे. या कुंडाच्या खाली तळाला असलेल्या भेगांतून जोरदार गंगेच्या पाण्याचा प्रवाह उफाळून येतो आणि काशीकुंड भरते व गायमुखातून सतत वाहते. गायमुखाखाली भाविक आंघोळ करू शकतात. उभे राहूनही स्नान करता येईल एवढ्या उंचीवर गायमुख बसवले आहे.

काशीकुंडाच्या पाण्याची आंघोळ झाली म्हणज राजापूरच्या गंगेचे स्नान झाले असे समजले जाते. गंगेच्या चौदाहि कुंडातील पाण्याचे उष्णतामान भिन्नभिन्न असते. या पाण्याची कितीही वेळ आंघोळ केली तरी ते बाधत नाही.

गंगेवरून थेट राजापूर शहरात आल्यावर राजापूरला लागूनच हे गाव आहे. या गावात टेकडीवर नैऋत्य दिशेला धूतपापेश्वर (महादेवाची) स्वयंभू पिंडी आहे. जागृत देवस्थानांत या देवस्थानाची गणना होते. गंगेप्रमाणेच धोपेश्वरला जाताना जांभ्या दगडांनी बांधलेली पाटी आहे. सुमारे दीड मैल लांबीचे घाटीवर जाताना अर्ध्या मार्गावर घाटीला मध्येच पावलाचा ठसा उमटला आहे. भाविक श्रद्धाळू लोक त्याला महादेवाचे पाऊल मानून त्याठिकाणी तांदूळ, बेल-साखर ठेवून नमस्कार करतात. येथे शंकराचे फार मोठे देऊळ असून बाजूने लहानसा धबधबा वाहतो. या देवळात श्रावण सोमवार, महाशिवरात्र हे उत्सव फार मोठ्या प्रमाणात वाखाणण्यासारखे होतात.

पूर्वी काही गंगापुत्र पहाटे गंगेवर स्नान करून झारीत गंगोदक घेत, रुद्रसुक्ताचा जप करीत, धोपेश्वरला येत आणि महादेवाला अभिषेक करीत असत.

या देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक पळसूले-देसाई असून तेच देवस्थानची संपूर्ण व्यवस्था पाहातात.

साईसच्चरितात उलेख असलेले काकासाहेब पुराणिक या धोपेश्वरचे श्रद्धावान निस्सीम उपासक होते व ते धोपेश्वर गावचे रहिवासीपण होते.

प्रत्यक्ष गंगामाईचे स्थान अगदी टेकडीच्या माथ्यावर असून त्याठिकाणी रखरखीत उन्हाळ्यातही गंगा अवतीर्ण होते. तशीच भर पावसाळ्यात आषाढ महिन्यातही तिचे आगमन होते. ती एकदा आली की तिचे जास्तीतजास्त ६६ दिवसपर्यंत तिचे वास्तव्य असते, तर केव्हा केव्हा ती एक महिन्याच्या आत लुप्त झाली असाही अनुभव आहे.

गंगा नसताना अनोधर मुसळधार पाऊस पडला तरी, कोणत्याही कुंडात आचमन करण्याइतकेसुद्धा पाणी मिळणार नाही. तर गंगामातेच्या आगमनाच्या वेळी प्रत्येक कुंडातील पाणी कितीही उपसा केला तरी ते संपत नाही. डोंगरमाथ्यापासून गावातील गावठाणातही पाण्याचे दुर्भिक्ष असताना, समुद्रसपाटीपासून खूप उंचीवर असणाऱ्या या टेकडक्षवरील गंगेच्या कुंडातून अविरत पाण्याचे झरे वाहाणे ही परमेश्वराची अगाध लीला मानावीच लागेल. या अद्‌भुत चमत्कारापुढे शास्त्रज्ञांची मति कुंठीत होईल आणि अंधश्रद्धा निर्मुलन मतवादी लोकही हतबल ठरतील यात संशय नाही.

ज्याला आपण भ्रष्टाचार म्हणतो तो गंगेवर मुळीच चालत नाही. भाविक भक्त कटाक्षाने पावित्र्य, स्वच्छता व शुद्धता या गोष्टी पाळतात. तर गंगापुत्रांनाआपले सर्व कार्यक्रम, सोवळेपणा शुचिर्भूत-पणाने आटोपावे लागतात.

सगर राजाचा नातू भगिरथ याने आपल्या पितरांना सद्‌गति देता यावी म्हणून खूप परिश्रम घेऊन अनेक संकटे सोसून सर्वांना शरण जाऊन स्वर्गातून गंगा आणली व गंगेचा परिसर पुनित आणि पावन झाला.

पण ही राजापूरची गंगा भूमिमधून उत्पन्न होते व जातानाही भूमितच गडप होते. भगिरथाने आणलेली गंगा ही पूर्वसमुद्राला मिळते तर राजापूरची गंगा, अखेर राजापूरच्या नदीवाटे अरबी समुद्राला मिळते.

## गंगेची आख्यायिका

या गंगेच्या उत्पत्तिबद्दल अशी आख्यायिका प्रचलीत आहे की; फार पूर्वी या गंगेच्या परिसरात गंगाजी साळुंके या नावाचा एक पंढरीचा वारकरी परंतु गरीब व सालस शेतकरी राहत असे. दरसाल तो पंढरपुरची वारी न खंड पडता पायीं करीत असे.

पण उत्तर आयुष्यात त्याला वार्धक्य निर्माण झाल्यावर पांडुरंगाची वारी करणे त्याला अशक्य झाले.

वारीचे दिवस जवळ येत असताना तो विठ्ठलाची मानसपूजा करीत, धान्याची मळणी काढत असलेल्या आपल्या कुटुंबियांसमवेत सचिंतपणे बसला होता. लक्ष पांडुरंगाकडे लागले होते. आणि डोळ्यातून प्रेमाश्रू वाहात होते. पांडुरंगाची तो मनोभावे करुणा भाकून आळवणी करत होता.

बा पांडुरंगा ''आमुचे आता कैचे येणे जाणे आमुचे इथेच राहणे'' -

त्या साळुंकेच्या नितांत श्रद्धेमुळे आणि निर्व्याज प्रेमामुळे भक्तीमुळे तो बसलेल्या वटवृक्षाजवळ मळणीच्या खांबाखालून गंगा अवतीर्ण झाली.

आजही गंगेच्या आगमनापूर्वी प्रथम नाचणीचा कोंडा येतो व मागून शुद्ध पाणी येते.

गंगेचे पाणी कितीही दिवस भांड्यात ठेवले तर ते खराब होत नाही अगर त्याची चवही बदलत नाही.

जेव्हा शक्य होईल तेव्हा प्रत्येक भाविक भक्ताने या पावन तीर्थक्षेत्राचे दर्शन घेऊन चिकित्सा विरहित श्रद्धायुक्त मनाने गंगेचे स्नान केल्यास कोणीसें म्हटल्याप्रमाणे - ''गंगास्नान फलं लभेत''

सुप्रसिद्ध मंत्र सर्वतोमुखी आहे. पहा -

**गंगा गंगेति यो ब्रुयात्,**
**योजनानां शतैरपी ।**
**मुच्यते सर्व पापेभ्यो,**
**विष्णुलोकं स गच्छति ॥**

गंगामातेला अभिवादन करून माझे अल्पसे गंगामहात्म्य संपवतो.

**''नमामि गंगे तव पाद पंकजं**
**सुरासुरैर्वन्दित दिव्य रुपम् ।**
**भुक्तिंच मुक्तिंच ददासि नित्यं,**
**भावानु सारेण सदा नराणाम ॥''**

❖ ❖ ❖

# सद्गुरु-समर्था

ऋद्धी-सिद्धीचा महामेरु तुं, तुं माझा सद्गुरु
सद्गुरु तुं माझा सद्गुरु ॥धृ०॥

अखंड चिंतन ध्यान धारणा
वेदोक्ती त्या गुढ-कल्पना
आकलवूनीया सुखविले जनां
प्रकटुनी तुं सत्वरु ॥१॥ तुं माझा....

तिमीर जावूनी सुर्य प्रकाशे
अज्ञानान्ती ज्ञान विकासे
तसा चांदनी-योग अम्हा तुं
पाहतोस उद्धरु ॥२॥ तुं माझा....

विश्व करीसी तुं अपुले घर
कुणा न देशी कधी अंतर
सर्वसाक्षी तुं परमेश्वर
दयामृत पुष्करुं ॥४॥ तुं माझा....

अन्य घेतले दुष्ट अनंत
कुठे न शकसे तयांस अंत
विसावण्या मज तुझाच प्रांत
देई देह अंधरु ॥५॥ तुं माझा....

षड्‌रिपुसी हो इथे विराम
सजले चैतन्य-मांगल्याधाम
सतत अमृता येत 'उधाण'
होते चिरंजीव पांखरु ॥६॥ तुं माझा...

संतकुळीच्या 'साई-समर्था'
ब्रह्मांडी ही समर्थवार्ता
जसा कृष्ण-सखा हा पार्था
तसा तुं अम्हा "सिद्ध संगरू" ॥७॥ तुं माझा....

**विजय वेरळकर**
नागपूर.

# "दत्त अवतार श्री संतराम महाराज"

- अशोक मोहिते, बडोदे.

—❖ ❖ ❖—

**समग्र भारतामध्ये आणि देश-विदेशात वसलेल्या गुजराती लोकांच्या हृदयात एक तीर्थगंगा म्हणून स्थान पावलेले श्री संतराम मंदिराचे आद्यस्थापक, आदिगुरु श्री संतराम महाराज उच्च कोटीचे सिद्धयोगी होते. श्री संतराम महाराज गुरु दत्तात्रेयांचा अवतार होते. जनकल्याणार्थ भ्रमण करीत असताना ते 'नडियाद' या पवित्र भूमीत येऊन राहिले.**

—❖ ❖ ❖—

श्री संतराम महाराज व स्वामी सहजानंदजी महाराज हे समकालीन संत होते. स्वामी नारायणाचे मंदिर नडियाद या शहरामध्ये बांधण्याची इच्छा जेव्हा तेथील हरिभक्तांनी स्वामी सहजानंदजी महाराज यांच्यापुढे प्रगट केली. तेव्हा ते म्हणाले होते की, 'या शहराची भूमि पवित्र आहे यात शंका नाही. परंतु या स्थळी एक सिद्ध योगी (श्री संतराम महाराज) आधीपासूनच विराजमान आहेत. त्यांच्या या निवासामुळे भविष्यात ही भूमी जगप्रसिद्ध ठरणार आहे. तेव्हा स्वामीनारायणाच्या मंदिरासाठी आपण दुसऱ्या जागेचा विचार करू'.... वगैरे.

श्री संतराम महाराज कारककोटिचे सिद्धपुरुष होते. संपूर्ण योग त्यांना सिद्ध झाला होता. ते चमत्कारी होते. जनकल्याणार्थ ते चमत्कार करीत असत. बऱ्याच भक्तांनी त्यावेळी त्यांच्या चमत्कारांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. नदीचे मूळ व संतांचे कूळ याविषयी कुणालाच काही माहित नसते. श्री संतराम महाराज अवधूतरुपाने गिरनारच्या परिसरामध्ये व तिथून गुजरातच्या निरनिराळ्या ठिकाणी हिंडले होते. बडोदे, वाकानेर, नर्मदेच्या किनारी, वराड वगैरे स्थळी त्यांचे आगमन झाले होते.

साधुसंत तो चलता भक्ता.... या चालीवर ते भक्तांना दर्शन देत हिंडत असत. भक्तगण त्यांची विनम्रपणे सेवा करीत असत आणि मनोमन खात्री बाळगून असत की या सेवेचा लाभ अवश्य मिळेल आणि तसा तो त्यांना मिळत असे. संतपुरुषांना एकास्थळी थांबविण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ असते. मोहजालात ते कधीच गुरफटत नसतात हे सत्य आहे. श्री संतराम महाराजांचे असेच होते....

पीपलग गावाच्या सीमेजवळ लखावाडचा पूजाभाई पटेल याच्या शेतामध्ये श्री संतराम महाराजांचे आगमन आणि त्या शेतामधील 'रायण' वृक्षाच्या बखोल्यामध्ये त्यांचा निवास हे त्यांच्या उत्कृष्ट साधुजीवनाचे दर्शन घडविते. त्यांच्या शरीरावर कौपीन रम्य दिसे. त्यांचा वावर खुल्या आकाशी निसर्गाच्या सान्निध्यामध्ये असे. त्यांच्या चरणस्पर्शाने व वास्तव्यामुळे या शेताची भूमी पवित्र झाली. या भूमीचे संस्कारबळ विलक्षण असावे म्हणूनच श्री संतराम महाराजांसारखा समर्थयोगी या स्थळी येऊन वसला.

कमळाकार छोट्या मंदिरात श्री. मनुकांत पटेल व त्यांचे कुटुंबिय यांनी याच शेतामध्ये श्री संतराम महाराजांच्या पादुकांची स्थापना केली व या स्थानाला छोट्या मंदिराचे स्वरुप देऊन ते जून्य महाराजांना अर्पण केले. या छोट्या मंदिराचे दर्शन करीत असताना जेव्हा डोळे मिटले तेव्हा त्यांना जे स्वरुप दिसले ते त्यांनी पुढीलप्रमाणे वर्णिले आहे.... 'या पुण्यप्रदेशात प्रवेश करतेवेळी मला प्रात:स्मरणीय महापुरुषाच्या वास्तविक स्वरुपाविषयी जाणून घेण्याची इच्छा तीव्र झाली. त्या इच्छेने प्रेरित होऊन या स्थळी समोर जळत असलेल्या दिव्याच्या ज्योतिमुळे मी थबकलो व माझे डोळे दिपले. त्यासमयी मला अलौकिक पुरुषाच्या आकृतिच्या दर्शनाचा लाभ झाला. कृश-गहूवर्णीय शरीर, त्यावर फासलेले भस्म, मस्तकी जटा, छोटीशी दाढी, कमरेला स्वच्छ सफेद वस्त्राचा विळखा, मूखकमलावर अलौकिक शांति व संमोहित स्मित.... असे ते विलक्षण स्वरुप होते. त्याचे वास्तविक स्वरुपसुद्धा

असेच असावे. त्याच्या दैवी दर्शनाने मी आनंदित झालो. त्याने मला सांगितले की, तो स्वत: गुरु दत्तात्रेयांचा अवतार आहे. आणि गिरनारच्या पवित्र प्रदेशांतून इकडे येऊन पोचला आहे वगैरे....' थोडक्यात सांगायचे झाले तर असे सांगता येईल की त्यांना श्री संतराम महाराजांनी या भूमीमध्ये गुरु दत्तात्रेयांच्या अलौकिक व दिव्य स्वरुपाचा साक्षात्कार घडविला....

त्यांचे काही भक्त असे सांगतात की ज्यावेळी नदी दुथडी भरून वहात होती, त्यावेळी संतराम महाराज नदीच्यावाहत्या व उफाळणाऱ्या पाण्यावरून सहजपणे चालत समोरच्या काठी गेले होते. ते जिथे-जिथे गेले तिथे त्यांनी असे नाना चमत्कार केले. आजसुद्धा त्यांच्या भक्तांकडून ते किस्से ऐकायला मिळतात.

## संतराम महाराजांचे सामर्थ्य

एकदा स्नानाच्यावेळी विहिरीवर बादली व दोरडे ठेवून जाण्याविषयी एका शेतकऱ्याला त्यांनी सांगितले. त्या शेतकऱ्याचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. तो बादली व दोरडे न ठेवताच निघून गेला. पुन्हा काही वेळानंतर तो शेतकरी जेव्हा पाणी भरण्याच्या निमित्ताने तिथे आला तेव्हा बघतो तो काय आश्चर्य! विहिरीचे पाणी थेट वरपर्यंत येऊन पोचले होते व संतराम महाराज त्या पाण्याने स्नान करण्यात मग्न होते. स्वत:च्या योगशक्तीने त्यांनी विहिरीचे पाणी वर आणलेले बघून तो शेतकरी त्यांचा परमभक्त बनला हे वेगळे सांगायला नकोच.

दुसरा एक प्रसंग असा घडला की एक शेतकरी गाड्यांमध्ये धान्य भरून घरी जायला निघाला होता. तो शेतकऱ्याला थांबवून घरी जाण्याविषयी महाराजांनी सुचविले. तो शेतकरी तिथेच थांबला आणि पाहतां-पाहतां वादळ-वारे सुटले. सोसाट्याच्या वाऱ्याबरोबर मुसळधार पाऊस सुरू झाला. तो शेतकरी महाराजांच्या दिव्यशक्तीने प्रभावित झाला.

अशाच एकेदिवशी एका शेतकऱ्याने महाराजांना भिक्षेविषयी पृच्छा केली असता त्यांनी घरून दुध आणण्यासाठी त्याला सांगितले. तो विचारात पडला, कारण त्याची म्हैस दुध देत नव्हती. महाराजांनी दिव्यज्ञानाने त्याची बिकट अवस्था जाणली व त्याला स्वत:चे कमंडलु देत म्हटले की यात तुझ्या म्हशीचे दुध काढून आण. तुझी म्हैस अवश्य दुध देईल. आणि तसेच झाले. महाराजांच्या कृपाप्रसादाने दुध न देणारी ती म्हैस, तिने महाराजांच्या कमंडलुमध्ये दुधाची धार सोडली....

हळूहळू त्यांचा भक्तगण वाढला, भाविक त्यांच्या दर्शनार्थ गर्दी करू लागले. त्यामुळे दयासागर, भक्तवत्सल महाराजांनी गावच्या सीमेवरून आपला निवास हलविला व ते सद्याचे नडियादमधील जे संतराम मंदिर आहे, त्यास्थळी येऊन राहिले. इथे त्यांनी समाजातील दीन-दुबळ्या, गरीब व दलित समाजाच्या उत्कर्षाचे कार्य केले. त्यामुळे समाजाच्या सर्व थरातील लोक त्यांचे भक्त झाले. त्यांनी सर्वांना साधे-सरळ जीणे जगायला लावून ईश्वरभक्तीचा मार्ग दाखविला. परस्पर प्रेमभाव, समभाव व शांतीचा अवलंब करण्याविषयी उपदेश केला.... त्यांच्या कार्याची व्यापकता व त्यांचे दिव्य स्वरुप बघता असे जाणवते की ते स्वत: आत्मस्थित व स्वयंसिद्ध योगी होते. संसार, माया यापासून ते पूर्णत: अलिप्त होते. त्यामुळेच ते अवधूत समजले जात होते. **असे हे योगीराज अवधूत श्री संतराम महाराज गुरु दत्तात्रेयाचे अवतारस्वरुप व श्री दत्तात्रेयांच्या योगमार्गाचे प्रवर्तक असे सिद्ध संत म्हणून ओळखले जाऊ लागले होते.** ते आजसुद्धा दर्शन देतात अशी भाविकांची श्रद्धा आहे.

श्री संतराम महाराजांच्या दिव्य योगशक्तीमुळे प्रभावित होऊन अनेक लोक त्यांचे भक्त बनले व दिवसेंदिवस त्यांचा भक्तगण वाढू लागला. त्यांची एक भक्तपरंपरा सुरु झाली. ती आजसुद्धा टिकून आहे व अधिकाधिक विस्तृत होत आहे. गुजरातमध्ये व गुजरातबाहेर तसेच परदेशांतसुद्धा त्यांची भक्तपरंपरा फैलावली आहे.

## संजिवन समाधी

गुजरातच्या नडियाद या शहरातील सध्याच्या 'संतराम मंदिरात' त्यांची समाधि व पादुका तसेच अखंड दिव्य ज्योतीचे दर्शन घडते. विशाल व भव्य वृक्षांनी आच्छादीत आणि नंदनवनासारख्या शीतल छायेतील शोभिवंत अशा या मंदिरात १६३ वर्षांपूर्वी योगीराज अवधूत श्री संतराम महाराज यांनी शुक्ल पक्ष पौर्णिमेच्या दिवशी संध्यासमयी जिवंत समाधि घेतली होती. संवत १८८७च्या या दिवशी त्यांचे पट्टशिष्य श्री लक्ष्मणदास महाराज व इतर संतवृंद व भक्तवृंद यांच्या उपस्थितीमध्ये आधी ठरल्याप्रमाणे हा विधी पार पडला. त्यावेळी आधीपासूनच त्यांच्याजवळ तुपाचा दिवा तयार ठेवला होता. त्याची ज्योत तेवत नव्हती. तो पेटवून ठेवला नव्हता. सर्वांनी नाम धून लावली, संकीर्तन केले आणि पाहता पाहता श्री संतराम महाराजांचा ब्रह्मरंध्रामधून प्राण निघाला आणि तुपाचा दिवा आपोआप प्रज्वलित झाला. हा 'दिवा'च सध्याची 'अखंड ज्योत' म्हणून ओळखली जाते. आजसुद्धा त्या अखंड

दिव्याची दिव्यज्योत प्रज्वलित आहे. अशातऱ्हेने बहुजन हिताय, बहुजन सुखाय विश्वकल्याणाचे महान कार्य पूर्ण करून संतराम महाराजांनी जिवंत समाधि घेऊन त्याच तपोभूमिमध्ये स्वत:च्या आत्मस्वरुपाचा सुवास पसरविला व ज्योतिरुपाने ते अखंड वास करून राहिले.

या मंदिरामध्ये गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या थाटात व भक्तीभावाने साजरा केला जातो. त्याशिवाय संतराम महाराजांचा समाधि महोत्सव माघ पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. या महोत्सवानिमित्ताने समाधिचे दर्शन, सायं-आरती आणि खडीसाखरवर्षाव यांचे दर्शन घडल्याने जीवन सार्थक होते. संतराम महाराजांनी जिवंत समाधि घेतली त्यावेळी खडीसाखरेचा वर्षाव झाला होता; प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला भाविक मोठ्या संख्येने नियमितपणे व हर्ष-उमंगाने इथे येऊन समाधिचे दर्शन घेत असतात.

श्री संतराम महाराजांनंतर त्यांचे पट्टशिष्य श्री लक्ष्मणदासजी महाराज (सं. १८८७ त १९२५) यांनी त्यांचा वारसा पुढे चालविला. त्यानंतर चतुरदासजी महाराज (१९२५ ते १९४१), श्री जयरामदासजी महाराज (१९४१ ते १९४७), श्री मुगटरामजी महाराज (१९४७ ते १९६१), श्री माणेकदासजी महाराज (१९६१ ते १९९३), श्री जानकीदासजी महाराज (१९९३ ते २०२६) व सध्याचे श्री नारायणदासजी महाराज यांनी ही शिष्यपरंपरा टिकवून ठेवली आहे. धनाची अभिलाषा ठेवायची नाही, धनसंचय करायचा नाही, दीन-दु:खी, पीडित वैष्णवांसाठी प्राप्त झालेले अन्न, धन-धान्य वगैरेंचा विनियोग त्यांच्या सेवेसाठी करायचा. ही परंपरा उत्तरोत्तर, संतराम महाराजांच्यागादीवर मठाधिपती म्हणून विराजमान झालेल्या सर्व महंतांनी चालू ठेवली आहे.

श्री संतराम महाराजांचा भक्तवर्ग एवढा मोठा आहे की त्यांचा एक 'संतराम भक्त समाज' नावाचा समाज अस्तित्वात आला आहे व तो थेट अमेरिकेपर्यंत जाऊन पोचला आहे. या भक्त समाजातर्फे गुजरातमध्ये बऱ्याच ठिकाणी श्री संतराम मंदिरे उभी झाली असून त्या प्रत्येक मंदिरात एक स्वतंत्र असा महंत आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे मठ परंपरा व त्यांचे मठाधिपति या परंपरेने खूप विस्तृत स्वरुप धारण केले आहे.

बडोदा, पादरा, उमरेठ, कोयली, रढु, करमसद, मढी, पच्छेगाम, वराड (बारडोली) वगैरे ठिकाणची मंदिरे खूप प्रसिद्ध असून भाविकांची श्रद्धास्थाने आहेत....

नडियादच्या 'संतराम मंदिरा'विषयी वर्णन करायचे झाले तर असेच म्हणावे लागेल की 'संतराम मंदिर'च्या स्थळाचे दर्शन म्हणजे योगीराज अवधूत श्री संतराम महाराजांच्या जीवंत समाधिचे दर्शन! त्यांच्या या मंदिराचा विस्तार खूप मोठा आहे. या मंदिराच्या परिसरात विशाल मैदान असून तिथे मोठ्या प्रमाणात ज्ञानयज्ञ व जाहिर धर्मसभांचे आयोजन केले जाते. अशा या महाखंडामध्ये जलकूप, पाणपोई, तसेच या खंडामध्ये यज्ञखंडालगत श्री संतराम कन्याशाळा आहे. मंदिराकडे येताना टॉवरजवळ श्री संतराम अतिथी निवास, तसेच दर्दी सेवा केन्द्र व सद्विचार समितिचे आरोग्य केंद्र आहे. महाखंडाला तीन भव्य प्रवेशद्वारं आहेत. मुख्य प्रवेशद्वारातून मंदिरात प्रवेश केला जातो. दुसरे प्रवेशद्वार भोजन खंडाकडे जाणारे आहे. तिसरे प्रवेशद्वार धर्मखंडाचे आहे. याशिवाय योगखंड, काष्टखंड, मुनिखंड, आरोग्य विभाग, शांतिसदन, याप्रमाणे खंड विभागले गेले आहेत. संत, भक्त, अतिथि, यात्रेकरू वगैरेंचा निवास-भोजनाची व्यवस्था असलेल्या वास्तु या परिसरामध्ये आहेत. लग्नकार्यासाठी एकूण दहा वधुवर पक्षांची सोय केली जाईल अशी कायमची व्यवस्था इथे आहे. श्री संतराम कुमारशाळा व संतराम विद्याशाळांमध्ये शिक्षण-संस्काराचे सिंचन केले जाते. मुनिखंड व त्याच्याशी संलग्न असे सद्विचार समिति संचलित श्री संतराम नेत्र चिकित्सालय, श्री संतराम लॅबोरेटरी, श्री संतराम ऑक्सिजन बँक वगैरे विविध सेवा उपलब्ध करून देणारी केंद्रे आहेत. मुनिखंडामध्ये कायमी धर्म व अध्यात्माच्या संत प्रवचनासाठी सत्संगभवन आहे. संत निवास, मनन-चिंतन, मौन या उपासनांसाठी आहे. मुनि निवास नैसर्गिक पवित्र वातावरणाची, शांतीची व एकांताची अनुभूति करविते. अशा या शीतल, पवित्र, शांत मुनि निवासाच्या वातावरणाने हरिद्वारच्या संतांना इथे हिमालयाच्या शीतलतेचा आनंद प्राप्त होतो. इथे भक्तांना अनुकूल वातावरण आहे. सोबत धर्मशास्त्राच्या, प्राचीन-अर्वाचीन ग्रंथांचे पुस्तकालयसुद्धा आहे. शांतिसदन हे छात्रालय आहे. उच्चशिक्षणासोबत धर्म-अध्यात्म, सेवाभाव याचे धडे इथे गिरवले जातात. मंदिराच्या महाखंडामध्ये असलेल्या कन्याशाळेजवळ श्री संतराम पोलियो फाऊंडेशनची वास्तु आहे. इथे फिजियोथेरपी सेंटर चालविले जाते. लकवाग्रस्त तसेच अन्य शारिरीक क्षति असलेल्या रुग्णांना वैज्ञानिक पद्धतीने कसरती, शेक व अन्य औषधंपाणी व उपचार इथे केले जातात. हे आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध असलेले सुसज्ज असे केंद्र आहे. तसेच रुग्णांना निवास-भोजनाची सुविधादेखील पुरविली जाते.

नडियादच्या श्री संतराम मंदिराचे नियंत्रण असलेल्या सेवा

संस्था पुढीलप्रमाणे आहेत. श्री संतराम जनसेवा ट्रस्ट, श्री संतराम सेवा ट्रस्ट, श्री संतराम पोलियो फाऊंडेशन, श्री सद्‌विचार समिती, श्री संतराम सोनो-एक्सरे क्लिनिक, श्री संतराम लॅबोरेटरी, श्री संतराम नि:शुल्क औषध सेवा केंद्र, श्री संतराम दर्दी सेवा केंद्र, श्री संतराम नेत्र चिकित्सालय, श्री संतराम अतिथी निवास, श्री संतराम ॲम्ब्युलन्स वाहन सेवा, श्री संतराम फिरते रुग्णालय, श्रीमती क. जे. पटेल चॅरिटेबल ट्रस्ट, श्री. क. र. शाह थानेखाला चॅरिटेबल ट्रस्ट वगैरे....

संतराम भक्त समाजाचे हे विविधरूपी सेवाकार्य वटवृक्षाप्रमाणे फैलावले आहेत. यामागे योगीराज अवधूत श्री संतराम महाराज यांची प्रेरणा आहे. तीच आज्ञा समजून प्रामाणिकपणे अन्न, धन-धान्याची मदत केली जाते. गरजवंतांना, दीन-दुबळ्यांना विनामूल्य औषधोपचाराची सोय उपलब्ध करून दिली जाते. सध्याच्या कलियुगात हे एक महान कार्यच म्हटले पाहिजे.

श्री संतराम महाराजांचे दर्शन प्रत्यक्षपणे तत्कालीन संत व भक्तांना घडले होते. त्यावेळी त्यांनी अप्रगटपणे जनकल्याणार्थ कार्य केले. **स्वत: अप्रगट राहूनच त्यांनी हे अलौकिक कार्य केले व त्यातच त्यांनी आनंद मानला. त्यामुळे त्यांचे छायाचित्र आज उपलब्ध नाही. इतर सर्व महंतांनी त्यांच्या आज्ञेनुसार त्यांच्याप्रमाणेच अप्रत्यक्षपणे म्हणजे अप्रगटपणे ही कार्ये केली व स्वत:चे छायाचित्र प्रसिद्ध होणार नाही याची दक्षता घेतली व कुठल्याही जाहिर कार्यक्रमात या सर्वांनी कधीच भाग घेतला नाही व घेत नाहीत. हा प्रघात आजपर्यंतच्या सर्व महंतांनी टिकवून ठेवला आहे.**

या कारणाने संतराम मंदिरामध्ये मूर्ति नाही व छायाचित्रसुद्धा नाही. श्री संतराम महाराजांची जिवंत समाधि व त्यांच्या समाधिच्यावेळी आपोआप प्रगट झालेली तुपाच्या दिव्याची ज्योत, हीच ज्योत सध्या 'अखंड ज्योत' म्हणून ओळखली जाते. याचेच दर्शन घडते. ही दिव्य ज्योत व समाधि आजसुद्धा श्रद्धावंताच्या नवसाला पावतात. म्हणूनच दर गुरुवारी व पौर्णिमेला भाविकांची या मंदिरामध्ये प्रचंड गर्दी असते. त्यावेळी सध्याचे महंत श्री नारायणदासजी हे भक्तांना मार्गदर्शन करीत असतात.

स्वामीनारायण संप्रदायाचे आद्यसंस्थापक स्वामी सहजानंदजी यांनी स्वत: या मंदिराच्या आदरातिथ्याचा प्रत्यक्षपण अनुभव घेतला असून येथे चालणारे सेवाकार्य व धार्मिक कार्य बघून ते खूप प्रमावित झाले होते.

# साई रुसले मजवरी

(चाल : पतित पावन नाम घेऊनी....)

श्री साई तव नांव घेऊनी आले मी द्वारा ।
श्री साई तू न देसी दर्शन जाते माघारा ॥१॥

कितीकदा मी आले गेले
साई तुझीया द्वारा ।
कधीं न स्मरे प्रसंग मजला
आज सारखाआला ॥२॥

अश्रू भरले नयनी माझ्या
आज असें का ? झाले ।
क्षणिक कळले माझ्याकरतें
साई रागावले ॥३॥

झंझावती दौरा माझा
नच त्याना आवडे ।
लागलीच मग मी बाबांना
घातले ते साकडे ॥४॥

नका देऊ मज कष्ट तुम्ही ते
दर्शन देण्याचे ।
दोन दिवस तरी राहीन बाबा
चरणी तुमच्या ते ॥५॥

कष्टविलेस तूम्ही दर्शन देण्या
सिद्धीक फाळकेला ।
प्रसन्न होऊनी नंतर देसी
आंबे तुम्ही त्याला ॥६॥

क्रोधीत होऊनी भक्तांवर तुम्ही
उगीच रागावशी ।
प्रसन्न होऊनी मग तुम्ही त्याना
इच्छत फळ देशी ॥७॥

फुलासम आहे कोमल बाबा
मन तुमचे श्री साई ।
दर्शन घेण्या सत्वर येईन
साई तुमच्या पायी ॥८॥

सौ. वंदना श्री. नलावडे
दहिसर (प), मुंबई.

# जैसा निर्वातिचा दीपु

**- एस्. ए. कुलकर्णी**

**जैसा निर्वातिचा दीपु । सर्वथा नेणे कंपु ।**
**तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरुपु । योगयुक्ती ।।''**

**या** एका ओवीमध्ये श्रीज्ञानेश्वर माऊलींनं संसारी माणसाला योग्य तपस्येचा अचूक मार्ग दाखविला आहे. वारा वहात नसला म्हणजे दिव्याची पेटलेली ज्योत थरथरत नाही. त्याप्रमाणे स्थिरबुद्धीच्या व्यक्तिमध्ये सुख-दु:खाची कोणतीही जाणीवच शिल्लक रहात नाही. 'नाना दुखीं प्राप्ती । जेया उद्वेगु नाहिं, चित्तिं । आणि सुखाचिया आर्ती । अडचिजेना ।। गोमटें काहिं पावे । तरि संतोषें तेणें नाभिभवे । जो ओखटेनि नांगवे । विषादासि ।।' योगतपस्येच हे स्पष्टीकरण आहे. कितीही दु:ख प्राप्त झालं, तरी ज्याला जीवानाचा उबग येत नाही आणि कितीही सुख लाभलं तरी जो अभिमानाने बेभान होत नाही, तोच खरा योगी. चांगल काही प्राप्त झाल की आनंदी होण आणि वाईट काही घडल की व्यथित होण ही सामान्य माणसाची लक्षणे होत. याचा अर्थ माणसान निर्लज्जपणें जगाव असा होत नाही; किंवा माणसान कुठल कर्मच करायच नाही असाही होत नाही. जोवर जीवन आहे, तोवर कर्म करावच लागणार; त्यातून सुटका नाही. परंतु त्या कर्माच्या इष्टानिष्ट फलाशी बांधिलकी नसावी हाच कर्मयोग.

सर्वसाधारणपणे आपण पाहतो की माणसाला कुठल्याही कामात यश प्राप्त झालं की त्याला खूप आनंद होता आणि अपयश नशीबी आलं की, माणून हातपाय गाळून निराश बनतो. विद्यार्थ्याने अभ्यास केला, तो चांगल्या गुणाने परीक्षा उत्तीर्ण झाला की त्याला आनंदीआनंद होतो आणि त्याचवेळी त्याचा अहंकारही वाढतो. उलट विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला की हताश होऊन प्रसंगी आत्महत्या करण्यात प्रवृत्त होतो - इथे त्याच्या मनाचा कमकुवतपणा स्पष्ट आढळून येतो. नोकरीचा इंटरव्ह्यू झाला व नोकरी लाभली की निहायत खूष; नाही लाभली की 'सारं संपलं' म्हणून हताश होण हा मनाचा कोवळेपणा; कमकुवतपणा. आपल्या कामाचं कुणी कौतुक केलं की आनंद; कुणी टीका केली की दु:ख ही मनाची अनिश्चितता. यासाठी मनावर नियंत्रण असणं अत्यंत आवश्यक असतं. सर्वसामान्यपणेआपण पाहतो की मुलगा जन्मला की आनंदीआनंद; मुलगी जन्मली की दु:ख हे परंपरेने चालत आलेलं आहे पिढ्यान्पिढ्या. हे संपूर्णतया अज्ञानच अहे. मुलगा मोठा झाला म्हणजे तो आई-वडिलांची खूप काळजी घेता, सेवा करतो असं क्वचित आढळतं; उलट आईबापांना 'अक्कल शिकवायला, गुरगुरायला' तो सिद्ध होतो; लग्न झालं की वेगळ राहून आईबापांना दूर कुठे खेडचाल-खोपटात वास्तव्य करून राहण्यास भाग पाडतो. मुलगी लग्नानंतर सासरी गेली, आपल्या प्रपंचात गुंतून गेली. तरी ती आईबापाची चिंता करीत असते. आठवण काढून अश्रुही ढाळते. कधी त्यांची भेट होईल म्हणून आतुरतेनं वाट पाहात असते. ''थकले आपुले बाबा आतात, एकच चिंता उरीं'' असं ती हळव्या मनाने आपल्या भावाला सांगून त्याचा निरोप घेते. असे अनेक अनुभव असूनही माणूस असं दुटप्पी वर्तन करीत राहतो. मुलगा व मुलगी यांच्यामध्ये भेदभाव राखणं कर्मयोगाविरुद्ध आहे.

सुख-दु:खाची अनुभूति हे सारे मनाचे खेळ असतात. तो एक लपंडाव असतो. जसं पहावं, जसं मानावं, तसं भोगावं लागतं. सबब, मनावर नियंत्रण-अंकुश ठेवल्याविना निश्चिंतता प्राप्त होत नाही. मन ताब्यात ठेवणं खंबीरपणे हीच एक खरी व अवघड तपोसाधना आहे. कोणत्याही बाबतीत गुंतून न राहणे हेच कर्मयोगी संतांचे प्रमुख लक्षण असते; गुंतून राहणे हे सामान्याचे लक्षण. कोणत्याही कामात यश मिळविण्यासाठी प्रयत्न करावेच लागतात. त्यातून सुटका नसतेच. परंतु यश लाभलं की सुख; अपयश आलं की दु:ख या भावनेच्या आहारी गेल्यास मनाचा समतोलपणा शिल्लक रहात नाही. कोणत्याही कर्माचरणामागे 'अभिलाषा' असते; आणि त्यामुळे सुखदु:खाचा अनुभव अटळ असतो. म्हणूनच श्रीकृष्णांनी अर्जुनाला बजावून सांगितलं **'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्माणि ।।'** - **'परि कर्मफळीं आश न करावी । आणि कुकर्मी संगति न व्हावी । हे सत्क्रिया चि आचरावी । हेतूविण ।।'** अस ज्ञानदेवांचं विवरण आहे. कर्म तरी केलच पाहिजे. ते सुटत नाही; पण काही इच्छा बाळगून कर्म करणं योग्य नसतं; वाईट कर्मामध्ये सहभाग

नसावा; चांगलं कर्म जरूर आचरावं - पण निर्हेतुकपणे.

चोरी करणे, भ्रष्टाचार करणे, इतरांना पीडा देत राहणे, व्यसनात बुडून राहणे, दुसऱ्याला फसवणे, लुबाडणूक करणे, दुसऱ्याचा घात करणे, दुखापत करणे, ठार मारणे, खुनी होणे ही सारी कुकर्मे. यापासून दूर राहणे आवश्यक असतं. परोपकार, इतरांना मदत करणे, सेवा, इतरांच्या सुखाआड न येणे, भेदाभेद न मानणे, गोरगरीबांना आश्रय देणे, त्यांना आर्थिक मदत करणे ही सत्कर्मे; परंतु ही सत्कर्मे करीत असतानाही 'प्रसिद्धी'ची-'सत्कारा'ची अपेक्षा केली तर ते सत्कर्म सफल ठरत नाही; तो 'आपमतलबीपणा'च ठरतो. ज्ञानदेव ज्ञानेश्वरीच्या १३व्या अध्यायात विवरण करतात -

**''पार्था तेणें पाडें। सन्मानें जो सांकडे।**
**गरिमे तें आंगाकडें। येओ नेदी॥**
**पूज्यता डोळां न देखावी।**
**स्वकीर्ति कानिं ना नाइकावी।**
**हा अमुका ऐसी न व्हावी। से चि लोकां॥**

**तेथ सत्काराची कें गोठी। कें आदरा होईल भेटी।**
**मरणेंसि साठी। नमस्कारितां।**
**वाचस्पतीचेनि पाडे। सर्वज्ञता तरि जोडे।**
**परि वेडिवेमाजि दडे। महिमे भेण॥**

**चातुर्य लपवी। महत्व हारवी।**
**पीसेपण मिरवी। आवडौनि॥''**

कीर्ती, सत्कार, सन्मान यापासून दूर राहणे हेच संतांचे - खऱ्या ज्ञात्याचे शुभलक्षण असते. सद्गुरु गाडगे महाराज आपले प्रवचन संपले की लोकांत मिसळून दूर पळून जात. त्यांना नमस्कार केल्याचं आवडत नसे. शेगांवचे सद्गुरु श्री गजानन महाराज, सद्गुरु अण्णाबुवा महाराज अगदी वेड्याप्रमाणे वागत - सद्गुरु साईबाबांचं वागणंही असंच निरिच्छ असायचं.

## कर्मयोगी व कर्मठ

'कर्मयोगी' आणि 'कर्मठ' यांच्यामधील फरक या संदर्भात जाणून घेणं आवश्यक आहे. दोघेही कर्म करीत असतातच. परंतु कर्मयोगी यशापयशाने विचल होत नाही; कर्मठ कर्माचं केवळ अवडंबर माजवीत असतो. सोंवळओवळं, विद्वत्ता-पांडित्य याचा दुराभिमान, कर्मे केली असताना मानसन्मानाची अपेक्षा बाळगणं, भयानक अहंकार, आपलंच तेवढं खरं, कुणीही आपल्याला काहीही सांगूच नये, सर्वांनी आपलंच सदैव ऐकावं अशी इच्छा बाळगणं ही सारी कर्मठपणाची लक्षणें. कर्मठ समाजामध्ये आजवर फूटच पाडीत आले आहेत, भेदाभेदाचं दाट जंगल त्यांनी वाढविलं, आपमतलबी रीतीरिवाज प्रस्थापित केले हे सर्वज्ञात आहेच. त्याचेच भोग आज समाज भोगत आहे. कर्मयोगी असा आग्रही, अहंकारी, स्वार्थी असत नाही; या संदर्भात ज्ञानदेवांनी परखड टीका केलेली आहे.

**'मग अश्वमेधां कोडी कीजे। रत्ना भरूनि पृथिवी दीजे।**
**एकांगुष्ठीं हि तपिजे। तपसहस्त्रीं॥**

**जलाशयाचेन नावें। समुद्र ही कीजतु नवे।**
**परि किंबहुना आधवे। वृथा चि ते॥**

**पाषाणावरि वर्षलें। जैसें भस्मीं हवन केलें।**
**कां खेव दीधलें। माउलिये॥**

**घाणा गाळिलें खडे। तेल ना पेंडि जोडे।**
**तैसें दळिद्र तेवडें। ठेलें चि आंगीं॥'** (अ. १७)

अनेक अश्वमेध यज्ञ केले, पृथ्वीच्या वजनाचे रत्नदान केले, एक आंगठ्यावर उभं राहून हजारों वर्षे तप केले, समाजाला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी समुद्राएवढा पाण्याचा साठा करून दिला, तरी हे सारं व्यर्थच ठरतं.

'कारणेन विना कार्यं न भवति' असं म्हटलं जातं. कोणत्याही कार्यामागे कारण अध्यर्थ असतं; परंतु कार्याच्या सफलतेला वा विफलतेला जो कांहीही महत्त्व देत नसतो त्यालाच कर्मयोगी म्हणतात. कर्मठ मंडळींच्या मनामध्यें कर्मामागें स्वार्थ असतो, भेदाभेद असतो आणि त्यामुळें कार्यात यश मिळाले कीं मनांत अहंकार निर्माण होतो व अपयश मिळाले कीं त्याचं खापर नजीकच्या मंडळींच्या डोक्यावर फोडून ते मोकळे होतात. आमच्या सर्वच संतांनी भेदाभेदाचा व स्वार्थाचा कडाडून विरोध केलेला आहे तो एवढ्याचसाठी. **'भेदाभेद कर्म नकळे त्याचे वर्म। वाउगाची श्रम वाहता जगीं॥'** (चोखोबाराय); 'सियाराममय सब जग जग जानी। करउँ प्रणाम जोरी जुग जुग पानी॥' (तुलसीदास); 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ॥' (तुकोबाराय) 'राम रहीम करीम केशव, अलख नाम एक साचा है॥ (कबीर); 'एकविध भाव सर्वांठायी धरी। द्वैताची ती उरी उरवू नको॥' (जनार्दनस्वामी); 'अभेदाचे उत्तम गुण। तेची भक्ति तेची ज्ञान॥' (एकनाथ); 'सबका मालिक एक' (सद्गुरु साईबाबा); 'गण गण गणांत बोले।' (सद्गुरु गजानन महाराज); परमहंस रामकृष्ण, स्वामी विवेकानंद यांनी हेच आवर्जुन वारंवार सांगितलं. तथापि आजही 'गळ्यांत जानवे असणाऱ्यांनीच देवाच्या गर्भगृहात जावून दर्शन घ्यावं; जानवे दाखविल्याविना प्रसादभोजनास बसता येणार नाही' असे वाचाळ निर्बंध आज एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर

लादले जातात. अशा कर्मठपणामुळें - सांप्रदायिक भेदामुळें समदृष्टि व स्वस्वरुपी स्थिरबुद्धि दुरावल्याविना रहात नाही.

कर्मयोगी कसा असतो, कर्मयोगी कसा जगतो याचं वर्णन सुभाषितकारांनी स्पष्ट वर्णन करून सांगितलेलं आहे. ''महीरम्या शय्या विपुलयुपधानम् भुजलता। वितानंच आकाशम् व्यजन मनुकुलोऽयमनिल: । स्फुरद्धि पश्यंद्रो विरति वनिता संगमुदित: । सुखं शांत: शेते मुनिरलनुभूतिर्नैपैश्वा ॥'' (वैराग्य शतक); ''क्वचिदभौमा शय्या क्वचिदपि च पर्यंकशयन: । क्वचिद् शाखाहारी क्वचिदपि च शाल्योदन रुचि: । क्वचिद् कंठाधारी क्वचिदपि च दिव्यांबर धरो । मनस्वी कार्यार्थी न गणपति दु:खंच न सुखम् ॥'' (नीती शतक). भूमीवर शय्या, बाहुंची उशी, आकाशाचच पांघरूण, वाऱ्याचं संगीतश्रवण, यामध्यें कर्मयोगी मुनीजन शांत सौख्याचा अनुभव नेहमी घेतात; कधी भूमीवर निद्रा करत कधी पलंगावर, कधीं सुग्रास भोजन तर कधी साधा फलाहार, कधी चिंधीचे फाटके वस्त्र अंगावर तर कधी नग्नावस्था, अशाप्रकारे वर्तन करणाऱ्या संतांना सुख व दु:ख दोन्ही सारखेच भासतात. सद्‌गुरु साईबाबा, सद्‌गुरु गजाननबाबा, सद्‌गुरु अण्णाबुवा, सद्‌गुरु गोंदवलेकर महाराज, सद्‌गुरु गाडगेबुवा, परमहंस रामकृष्ण सारे असेच वागले. साईबाबांनीं भेदाभेद कधी मानलाच नाही; त्यांनी अनेकांचे दु:ख दूर केले; स्वत: जात्यावर ज्वारी दळून भाकऱ्या केल्या, गांवातून फेरी मारून अनेकांच्या समस्या दूर केल्या, हिंदू-मुसलमान सर्व जातीधर्माच्या लोकांना जवळ केलं; गजानन महाराजांनी बच्चुलालने अर्पण केलेली दक्षिणा, वस्त्रालंकार याचा त्याग केला, दोन पेढे घेऊन ते निघून गेले; महताबशहासमवेत त्यांनी भोजन घेतलं; अन्न हे परब्रह्म याचं प्रायोगिक शिक्षण दिलं; गोंदवलेकर महाराजांनी दुरित-दलितांचे प्रश्न सोडविले - कर्मयोगाच्या दीक्षा दिल्या; अण्णाबुवा महाराजांनीही नग्नावस्थेंत आयुष्य वेचलं अन् दुरितांचे दु:ख दूर केले; परमहंस रामकृष्णांनी ब्रह्मस्वरुपाचा-, कर्मयोगाचा सदैव पाठ दिला हजारो शिष्यांना. परंतु अश्रद्ध मंडळींना ही थोतांडं वाटतात - हे त्यांचच दुर्दैव.

'आशा ही समूळ खणोनि काढावी। तेंव्हाची गोसावी तेणें व्हावे' असं तुकोबारायांनी निक्षून सांगितलं. ज्ञानदेवांनी तर संपूर्ण ज्ञानेश्वरीमध्यें कर्मयोगाचा, जाणीव भक्तिचा वारंवार पुरस्कार केलेला आहे. 'चित्ती अहंतेचा ठाओ। जिभे सकलशास्त्रांचा सराओ। ऐसेनि कोडी एकी जिओ। परि न पाविज मातें ॥' असं स्पष्टपणें त्यांनी सांगितलं आहे. अहंकार जिथे असतो तिथें परमात्म्याची अनुभूति संभवतच नाही - असं त्यांचं स्पष्ट मत आहे. षड्रिपु जिंकल्याविना कर्मयोगी होताच येत नाही. आशा, लोभ, तृष्णा, अहंकार, भेदाभेद यांचा त्याग व श्रद्धा व सम्यग्ज्ञान यांचा समन्वय हीच कर्मयोग्याची मुख्य लक्षणें असतात. या संदर्भातील दोन छोट्या कथा इथे उद्धृत करून हा लेख मी संपवितो.

साध्वी मीरा नि:संगपणे श्रीकृष्णाची भक्ति करीत तन्मयतेने नृत्यगायन करीत असे. वृंदावनमधील श्रीकृष्ण मंदिरामध्यें एक कर्मठ पुजारी होते. 'स्त्रीचें मुखही पाहायचे नाही' असें त्यांचे ब्रीद होते. मंदिराच्या प्रवेशद्वारावर द्वारपाल असायचे व कुठल्याही स्त्रीला मंदिरांत प्रवेश द्यायचा नाही हेच द्वारपालांचे काम होते. मीरा एकतारी वाजवीत, गात-नाचत नगरीमध्यें प्रवेशली. तिचं भक्तिरसपूर्ण नृत्य-गायनाचा आस्वाद घेत हजारों नागरिक तिच्या मागून चाललेले. मीरा मंदिरापर्यंत आली. द्वारपालही तिच्या नृत्यगायनानें मोहून गेले व पुजाऱ्याच्या आज्ञेचा त्यांना विसर पडला. मीरा मंदिरांत गेली. तेंव्हा पुजाऱ्याचें पित्त खवळले. त्यानं विचारलं, ''तूं कशी आलीस मंदिरांत ? मी स्त्रीमुख पहात नसतो हे तुला कळालं नाही का ?'' मीरा हंसली व म्हणाली, ''मीआजवर समजत होते कीं पुरुषोत्तम हाच एक पुरुष. आता कळलं की दोन पुरुष आहेत. एक पुरुषोत्तम व एक आपण. फरक मात्र आहे. माझा पुरुषात्तम शेकडों गोपिकासमवेत रासक्रीडा करीत होता. त्यानं स्त्रीला निषिद्ध मानलं नाही. आपण भेद मानणारे नाममात्र पुरुष आहात - नाही का ? तुम्ही इथें श्रीकृष्णाची उपासना करता - श्रीकृष्णासमवेत राधा नाही का ? राधा पुरुष होती का ?'' यावर पुजाऱ्यानें मीरेपुढं लोटांगण घातलं. मीरा कर्मयोगी; तर पुजारी कर्मठ !

कबीरांचा मुलगा कमाल. कबीरांचा कर्मयोग-भक्तियोग म्हणजे एक आदर्शच ! अनेक भक्त कांही अलंकार-जडजवाहीर कबीरांना अर्पण करण्यासाठीं येत. कबीर म्हणत, 'ए तो मिट्टी ही है - इस मिट्टी को क्या करेंगे हम ? ले जाओ वापस.' कबीरांच्या या निरिच्छपणानें भक्तजन भारावून जात. कबीरांचा मुलगा कमाल याचंही वागणं त्याच प्रकारचं होतं. लोकांनी काही अलंकार - जडजवाहीर आणले कीं तो म्हणत असे, ''भैय्या, मिट्टी लाए और मिट्टी फिर ले जा रहे ! अरे रख जाओ, मिट्टी ही है.' तेव्हां कांही जणांनी याचा वेगळा अर्थ लावला व त्यांनी कबीरापुढें तक्रार केली. ''तुम्ही एवढें निरिच्छ, पण मुलगा कमाल तर म्हणतो, ''ही माती. परत कशाला नेता. ठेवा इथेच ! म्हणजे तो लोभी आहे नाही का ? तुमच्या विरुद्ध त्याचं वर्तन आहे.'' तेव्हा कबीरांनी कमालला घराबाहेर काढले. ते म्हणाले, ''तूं वेगळी झोपडी बांधून रहा. तूं स्वार्थी लोभी आहेस. तुझा संपर्क नको मला.'' त्यानुसार कमाल एका वेगळ्या झोपडींत राहूं लागला. एकदां काशीचा राजा कबीरांच्या भेटीस आला. त्याने एक मौल्यवान हिरा आणला होता कबीरांना अर्पण करण्यासाठी. कबीर म्हणाले, ''हा दगड कशाला आणला ? जा घेऊन परत.'' राजा कमालच्या झोपडींत गेला व त्यानें तो हिरा कमालपुढें ठेवला. कमाल म्हणाला, 'हा तर दगड. दगड कशाला आणला ? दगड परत

तरी नेणार कसे ? ठेवा कुठेही.'' राजाला वाटले कमाल लोभीच आहे. त्याने तो हिरा झोपडीच्या काटक्यांच्यामध्यें खोंचून ठेवला व राजा परत गेला. पंधरा दिवसानंतर कमालची परीक्षा घेण्यासाठी राजा पुनः आला. त्याने विचारले, 'मी ठेवलेला हिरा कुठे आहे ?' कमालने प्रश्न केला, 'कोणता हिरा ? मला तर आठवत नाही.' राजा म्हणाला, 'मी माझ्या वजीराला घेऊन आलो होतो. त्याच्या साक्षीनें हिरा इथें ठेवला होता.' कमालनें आठवण्याचा प्रयत्न केला कांही क्षण. तो म्हणाला, 'हां ! तो तुम्ही आणलेला दगड होय ? तुम्हीच तो कुठे ठेवला तो शोधून काढा.' राजाला झोपडीच्या काटक्यांत खोचून ठेवलेला हिरा जसाच्या तसा सापडला. राजानें कमालपुढें लोटांगण घातले. कबीरापेक्षा कमालचे एक पाऊल पुढेच होते. कर्मयोगाच्या दृष्टीनें !

'निर्वातीचा दीपु' या पद्धतीनें जीवन व्यतीत करणे म्हणजेच कर्मयोग. ना आकांक्षा, ना आनंद, ना खेद ना खंत ! तो साध्य करावयाचा झाल्यास मनाला वैचारिक जाणीवेची संथा द्यावी लागते. मूलतः श्रद्धा असावी लागेत कुठेतरी. 'श्रद्धावाँल्लभते ज्ञानं' असं म्हटलेलं आहे. ती श्रद्धा कुठेतरी संत-सत्पुरुषावर-भगवंतावर असावी लागते. नंतर वाचन, चिंतन, ध्यान, आराधना-उपासना याद्वारें कर्मयोगाचें मूळ सूत्र अंगिकारावें लागते. कर्मयोग एकदम साध्य होऊं शकत नाही. भक्तियोगाच्या साम्राज्यांत श्रद्धापूर्वक वावरलं म्हणजे मनावर ताबा मिळविता येतो. हळूहळू त्यासाठीं संसाराचा त्याग करून गिरीकंदरांत वास्तव्य करावें लागत नाही. माणूस आपणच आपला गुरु होऊं शकतो. हे मानशास्त्रज्ञांनीही मान्य केलेलं आहे. एकदां मन संपूर्णतया ताब्यांत आलं कीं सुख-दुःखाच्या कल्पना विरघळून जातात आणि मग ''जैसा निर्वातिचा दीपु। सर्वत्रा नेणे कंपु। तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरुपु। योगयुक्तु॥'' हा अनुभव प्राप्त होऊं शकतो. नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखोबा, गोरोबा आदी आमच्या संतांनी संसाराचा त्याग न करतां कर्मयोग आचरणांत आणला व समाजापुढें आदर्श ठेवले. त्यांचं साहित्य गुरुस्थानीं आहे. त्यांचा सातत्यानें अभ्यास केला तर स्थिरबुद्धि व स्वस्वरुप यांचं ज्ञान प्राप्त होतं अन् भक्तियोगाद्वारें कर्मयोगही आत्मसात करता येतो. रामकृष्ण परमहंस म्हणत, 'सगळे कनक-कामिनीसाठीं रडतात; पण ईश्वरासाठीं कुणी रडत नाही. ईश्वरप्राप्तीसाठीं मनःपूर्वक रडा रे !! आमच्या संतांनी आम्हाला युगानुयुगें हेंच शिकविलं आहे. म्हणून तुकोबाराय म्हणाले, 'काय वानु मी संताचें उपकार। मज निरंतर जागविती।' कर्मयोग साध्य होणें कठीण असं मानलं जातं; परंतु भक्तियोगाच्या द्वारांतून कर्मयोगाच्या मंदिरांत शिरता येतं. फक्त श्रद्धा व प्रयत्न आवश्यक असतात.

## दैवी प्रकाश

जेव्हा तुझ्या पदांची, जीवास ओढ लागे
उन्मुक्त अंतरीचा, दैवी प्रकाश जाणे ॥धृ०॥

काटेच काळजाला, जरि बोचले अनंत
जखमाच भूषणे मीं, त्याचो मुळी न खंत
पद टाकिले पुढे पण, वळलो कधी न मागे ॥१॥

निरुपाय प्राक्तनाचा, साथी मला मिळाले
बोलून गोड गेले, नक्राश्रू ते गळाले
वाणी कृतीत मेळ, त्यांच्या कधी न लागे ॥२॥

नाही गमावला मी, क्षण एक बोलण्यात
नी घेत आर्त ताना, रमलोच गायनात
नयनात नीर दाटे, जुळले अतूट धागे ॥३॥

इमले उभे तयांचे, मी राहिलो भणंग
साईस घेतलेमीं, जोडोनीया अभंग
त्या गावचा नव्हे मी जाईन याच मार्गे ॥४॥

ग्रीष्मात तापलेली, आषाढ प्राशितांना
फळते सुरेख सृष्टीं, जीवास देत प्राणा
वाटे नव्या मनूची, गाथा अमोल सांगा ॥५॥

प्र. ग. तल्हारवार 'प्रगत'
वरोरा (चंद्रपूर).

# अध्यात्मज्ञान : एक चिंतन

- रामदास वालजी सिंगनूरकर, जळगाव.

आत्मनि+अधि म्हणजे अध्यात्मासंबंधी असा अध्यात्माचा विग्रह.

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थ दर्शनम्** ॥ अ. १३/११

अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी बुद्धी होणे व तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्तांचे परिशीलन यास ज्ञान म्हटले आहे. मानवी जीवनात पंचभूतात्मक देह असल्यामुळे आहार निद्रादिक निसर्गत: आहेतच. पण विकसनशील बुद्धी म्हणजे ज्ञान हे अधिक प्रमाणात त्याच्या वाट्यास आल्यामुळे भौतिक जीवनाबरोबर कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, नैतिक व आध्यात्मिक असे त्याचे जीवन विस्तृत आहे. हे जीवन सांभाळील तोच श्रेष्ठ मानव समजला जाईल. कायदा, नीति, धर्म, समाज, अध्यात्म इत्यादि मानवी जीवनातच वापरली जाणारी मूल्ये आहेत. त्यांचा विसर त्यास पडणे म्हणजे त्याने अमूल्य जीवन गमविले असे होईल. ज्याने जीवनाचे मूल्य ओळखले तो साधक व ते संपादन केले तोच सिद्ध, मुक्त, संत जाणावा. प्रपंचात ज्ञानानंतर क्रिया होत असते किंबहुना क्रिया न झाली तर ते ज्ञानही व्यर्थ समजले जाते. समोर ताट वाढलेले आहे, त्यातील पक्वान्नाचे ज्ञानही झाले आहे, पण भक्षणाची क्रिया न झाली तर तृप्ती नाही. अशी आणखीही अनेक उदाहरणे देता येतील. यासच "आवडे ते वृत्ति किरीटी। आधी मनौनीचि उठी। मग तेवाचा दिठी। करासी ये॥ असे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे. मात्र ज्ञानानुसार होणारी क्रिया त्या ज्ञानाच्या प्रकारावर अवलंबून असते. ते ज्ञान जसे सात्त्विक, राजस अथवा तामस असेल तद्वत क्रियाही तशीच घडते. संसारातील ज्ञान न संपणारे म्हणून क्रियाही न संपणारीच असते. ज्ञान संपत नाही याचा अर्थ ज्ञेयानुसार ज्ञान होत असते. ज्ञेय अनंत आहेत म्हणून त्यांची ज्ञानेही अनंत आहेत. त्या अनंत ज्ञेयाच्या ज्ञानानुसार त्यांची प्राप्ती होण्याकरिता केल्या जाणाऱ्या क्रियाही अनंत होतात. ज्ञान, क्रिया व क्रियेचे फळ भोगण्याकरिता देह, पुन्हा ज्ञान, पुन्हा क्रिया हे रहाटगाडगे अखंड चालू असणे यासच संसार म्हणावे. "वृत्ति ऐसे मन धरिती। मना ऐसी क्रिया करिती। केलीया ऐसी वरती। मरौनि देहे॥" असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

परमार्थात याच्या उलट असते, म्हणजे जे कर्म घडेल ते ज्ञानप्राप्तीचे साधन म्हणून घडेल. अशी साधने बहिरंग, अंतरंग इत्यादि अनेक प्रकारची आहेत. मल, विक्षेप व आवरण असे तिन्ही दोष निवृत्त झाल्यानंतर जे ज्ञान गुरुकृपेने होते त्या ज्ञानानंतर पुन्हा कोणतेही कर्म होत नाही. संसारातील ज्ञान हे त्रिपुटीरूप आहे, पण ह्या ज्ञानात त्रिपुटी रहात नाही. ज्ञानानंतर कर्ता उरेल तर कर्म. पण हे ज्ञान झाल्यावर कर्ता कर्म कार्य ही त्रिपुटीच राहत नाही. जेव्हा ज्ञाता म्हणजे प्रमाता (जीव) जीवपणाने असतो तेव्हाच कर्ता असतो. पण या ज्ञानात प्रमातात राहत नाही. "सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।" (गीता अ. ४/३३). "द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ. कारण हे पार्था, सर्व प्रकारच्या सर्व कर्मांचे पर्यवसान ज्ञानात होत असते."

"जे धावतया कर्माची लाणी। नैष्कर्म्य बोधाची खाणी। भुकेलिया धणी। साधनाची॥" असे श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात. प्रमाता म्हणजे जीव. त्यास शास्त्रीय भाषेत प्रमातृ चैतन्य असे म्हणतात. ज्यावेळी अंत:करण चैतन्याच्या स्वरुपात अंतर्भूत होऊन वर्तमान व्यावर्तक होते, त्यावेळी ते विशेषण होते व चैतन्य विशेष्य होते, पण हा विशेषण विशेष्य भाव कल्पित आहे, वास्तव नाही. ज्यावेळी जीव ज्ञानसंपन्न होतो त्यावेळी अंत:करण, मन हेही आपले स्वरुप नव्हे, ते करण आहे, कल्पित आहे आहे असे समजतो. अमातृत्व हा बंध आहे. वर लिहिल्याप्रमाणे जेव्हा त्या जीवास बोध होतो, तेव्हा प्रमाता जीव या बंधातून मुक्त होतो, त्याबरोबर कर्ता, भोक्ता या सर्व अज्ञान परिकल्पित भावना नष्ट होतात. म्हणून आत्मज्ञानानंतर कर्म नाही. "तेथे स्वभावे धनंजया। नाही कोणीच क्रिया। हीच कृतकृत्याता होय. एखाद्या घरात अंध:कार शेकडो वर्षांचा जुना असला तरी दीप आणताच तो दूर पळतो, नव्हे प्रकाशमय बनून जातो. त्याप्रमाणे अनादि अज्ञानामुळे चैतन्यास जीवदशा प्राप्त होते, ती आत्मज्ञान होताच नाहीशी होते, म्हणजे तो जीव परब्रह्मरुप होतो. आत्मस्वरुपी क्रिया नाही, संस्कार नाही असे म्हटले जाते. याचा अर्थ विशिष्ट आत्म्यावर संस्कार. मग ते गुणाधान वा दोषापनयन या उभयरुपाने होत असतात. केवळ शुद्ध जो आत्मा तो अक्रिय, असंग आहे. विशिष्टत्व धर्म आत्म्याच्या ठिकाणी कल्पित आहे. तळ्यातील पाण्याची पातळी वरुन समान दिसते, पण आत मात्र खोली समान नसते, सर्व विषमताच असते.

खडीसाखरेचे खडे जरी विषम असले तरी गोडी ही समान

असते. तद्वत् काही माणसांचे वर्तन जरी विषम दिसत असले तरी ते समत्वपूर्णच असते. साधुसंतांचे असेच असते. कारले कडू असते हे प्रसिद्ध आहे. त्याची भाजी केली जाते. तीत पदरचा गूळ, चिंच, मसाला इत्यादि घालून त्यात गोडी आणली जाते. मात्र म्हणताना कारल्याची भाजी फार गोडी झाली असे म्हटले जाते. त्याप्रमाणे विषय हे तमोगुणाचे कार्य म्हणून स्वरुपाने दुःखरुपच आहेत, पण त्यात अज्ञानाने अनुकूल बुद्धि ठेवून स्वरुपानंद त्यांच्याद्वारा भोगला जातो. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''विषयाचे जे सुख। ते साद्यंतचि जाण दुःख। परी काय कीजे मूर्ख। न सेविता न सरे॥''

संसारात मनुष्य तृप्त नसतो.तो परमार्थाविषयी तृप्त असतो. संसार कितीही केला तरी करावाच वाटतो. परमार्थ मात्र थोडा केला तरी पुरेसाच वाटतो. हीच तृप्ति, पण ही खरी नव्हे. संसारात प्राप्त भोगाने मनुष्याने तृप्त असावे. ''ठेविले अनंते तैसेचि रहावे''। व परमार्थसाधनात अतृप्त असावे, म्हणजे कितीही पारमार्थिक साधने केली तरी करावीच वाटतात, कारण त्यात फळरुपता आहे. वेदांतशास्त्रात जगही ज्ञेय व परमात्माही ज्ञेय आहे असे म्हटले जाते. जग ज्ञेय याबद्दल गीता अ. १८ मध्ये ''ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता'' हा श्लोक प्रमाण आहे. परमात्मा ज्ञेय याबद्दल ''ज्ञेयं परिज्ञाता'' हा श्लोक प्रमाण आहे. परमात्मा ज्ञेय याबद्दल ''ज्ञेय यत्तत्प्रवक्ष्यामि'', ''भूतभर्तृच तज्ज्ञेयं'' इत्यादि श्लोक प्रसिद्ध आहेत. त्यात फरक एवढाच की, परमात्मा हो यथार्थ ज्ञानाचा विषय या रुपाने ज्ञेय आहे, म्हणून त्याच्या ज्ञानाने मोक्ष प्राप्त होतो व जग अन्यथा ज्ञानाचा विषय म्हणून ज्ञेय आहे. स्वप्नातील पदार्थाप्रमाणे म्हणून त्याच्या ज्ञानाने बंध प्राप्त होतो. परमात्मा हा ज्ञानही आहे व ज्ञेयही आहे. ''ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्॥'' अ. १३/१७

त्यालाच तेजाचेही तेज, व अंधःकारपलीकडचे म्हणतात; ज्ञान जे जाणावयाचे ते ज्ञेय व ज्ञानगम्य म्हणजे ज्ञानानेच कळणारेही तेच असून, सर्वांच्या हृदयात ते अधिष्ठित झालेले आहे. परमात्म्याची ज्ञेयता वृत्तिसापेक्ष, पण ज्ञान मात्र स्वरुप आहे. सर्व लोक संसार करतात, पण संसाराला जाणत नाहीत. सर्वांना संसाराची खरी ओळख म्हणजे ज्ञान असते तर ''यस्तं वेद स वेदवित'' जो त्या संसारास जाणतो तो वेदोवत्ता, सर्वज्ञ होय असे गीतेत सांगितले आहे.

**''ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम।**
**छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित॥**

अ. १५/१

मूळ एक वर व शाखा अनेक खाली असून जो अव्यय म्हणजे कधीही नाश न पावणारा, छंदांसि म्हणजे वेद ही ज्याची पाने, असे ज्या अश्वत्थवृक्षाचे वर्णन करतात, तो वृक्ष ज्याने जाणला तो पुरुष खरा वेदवत्ता होय.''

ज्ञानकर्मसमुच्चय संसारात शक्य आहे, किंबहुना ज्ञानकर्मसमुच्चय म्हणजेच संसार, संसारातील ज्ञान व कर्म एकाच सत्तेतील असते, पण परमार्थात तो शक्य नाही, कारण ते ज्ञान कर्म उरू देत नाही.

**''ज्ञानाग्निः सर्व र्माणि भस्मसात्कुरुते तथा॥**

अ. ४/३७

ज्याप्रमाणे प्रज्वलित केलेला अग्नि सर्व काष्ठे भस्म करून टाकितो त्याप्रमाणे ज्ञानरुप अग्नि सर्व कर्माचे शुभाशुभ बंधन भस्म करून टाकितो.''

आकाशात विमान चालू शकते पण स्थिर राहू शकत नाही. स्थिर राहण्याकरिता त्यास पृथ्वीचा आश्रय करावा लागतो, तसे संसारात मन सतत भ्रमण करीत असते, पण स्थित राहत नाही, ते परमात्मस्वरुपीच स्थिर राहील.

**''तुका म्हणे चित्ता।**
**वाटे न व्हावा परता॥**
**अचळ न चळे ऐसे झाले मन।**
**धरुनि निज खूण राहिलोसे॥''**

प्रपंच व परमार्थात साध्यातच भेद आहे. साध्य बदलले की तेच साधन दुसरीकडे उपयोगी पडते.

ज्या कानांनी गाणे ऐकावयाचे, त्याच कानांनी भगवद्-गुणानुवादही ऐकावयाचा. ज्या डोळ्यांनी सिनेमा बघायचा त्याच डोळ्यांनी भगवन्मूर्तीचे दर्शन घ्यावयाचे. ज्या मनाने विषयाचे ध्यान करायचे, त्याच मनाने भगवद्ध्यान करावे लागते, ज्या बुद्धिने विषयाचे ज्ञान होते, तीच बुद्धि परमात्मज्ञानाचे साधन होऊ शकते. मात्र ती इंद्रिये, मन, बुद्धि ही संस्कारित पाहिजेत म्हणजे शुद्ध पाहिजेत, तेव्हाच त्याचा परमार्थाकडे उपयोग होतो. ध्यानयुक्त अंतःकरणात सर्वकाली भगवत्साक्षात्कार होतो.

**''पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनी।**
**जाग्रती स्वप्नी पांडुरंग॥''**

स्वच्छ पाण्यातच तळ दिसतो. तसे शुद्ध अंतःकरणातच भगवान प्रगट होतो.

लग्नसभारंभात वधुवरावर अक्षता टाकण्याची पद्धत आहे. त्या टाकताना इतरांच्या अंगावरही पडतात. पण कोणी असे समजू नये की, आमचे लग्न झाले. लग्न वधूवरांचेच होते, कारण तेथे तेच अधिकारी आहेत. याप्रमाणे संतांच्या उपदेशवचनांच्या अक्षता जरी सर्वांवर पडतात तरी तद्रूपतेसी सुलग्न हे फक्त योग्य अधिकाऱ्याचेच लागते. इतरांकरिता तो उपदेश व्यर्थ जातो.

कर्म व ज्ञान यांच्यामध्ये भक्ती असावी ती दोघांवरही उपकारक होते. सूक्ष्म शरीरचे काम, क्रोध, लोभादि विकार होत; कारण शरीराचा रोग म्हणजे स्वस्वरुपाचे अज्ञान. मौल्यवान वस्तु अनेक वेष्टनात ठेविली जाते. तसा सुचित्सुखधन आत्मादेखील अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय या पंचकोशाच्या वेष्टनात ठेवला गेला आहे. विवेकाने या कोशांचा निरास झाल्याविना त्याची प्राप्ती होणार नाही. वेद म्हणजे ज्ञान. ज्ञानाचा विषय ज्ञेय परमात्माच होऊ शकतो. अन्य कोणी ज्ञानाचा विषय होत नाही, हे मागे सांगितलेच आहे, म्हणून वेद परमात्म्यासच विषय करतो. सर्वांच्या हृदयात मी अधिष्ठित असून स्मृति, ज्ञान व अपोहन म्हणजे तन्नाश,ही माझ्यापासूनच होतात आणि सर्व वेदांनी जे काय सांगावयाचे ते मीच. वेदांताचा कर्ता आणि वेद जाणणाराही मी. **''वैदेश्च सर्वैरहमेव वेध: ।''** असे भगवान गीतेत सांगतात. मोक्ष म्हणजे आत्मस्वातंत्र्य, देहस्वातंत्र्य नव्हे. कारण देह काळ, कर्म, त्रिगुण इ. अनेक पाशांनी बांधला आहे. तो त्यातून मुक्त होणार नाही. आत्मा हा स्वतंत्रच आहे. ते स्वातंत्र्य ज्ञानाने अनुभविणे म्हणजे मोक्ष. तत्त्वज्ञानाविना जीवन म्हणजे जलाविना सरोवर, प्राणाविना देह. एवढीच किंमत जीवनाची समजावी. कांच व आतील दिवा यात जितके अंतर आहे तितकेच अंतर बुद्धि व आत्मा या दोघात आहे. धर्मप्रवण असणे हे मानवतेचे मूळ आहे, ते नसेल तर पशूत व मानवात काही अंतर नाही. स्वैराचार हा कधीही सुखप्रद होत नसतो. ''धर्मेण हीना पशुभि: समान: । हे वचन तेच सांगते. आडात पाणी पुष्कळ असले तरी पोहरा जेवढा असेल तेवढेच वर येते, अधिक येत नाही. तसे ज्ञान जरी व्यापक आहे तरी बुद्धि जशी असेल तेवढेच ग्रहण होऊ शकते. व्यवहारात मनुष्य कर्म करीतच असतो. पण गीता त्या कर्माचा योग बनविते. म्हणजे तेच कर्म गीतेत सांगितलेल्या हातवटीने केले की कर्मयोग झाला व तेच नंतर मोक्षाचे साधन बनतो. ती हातवटी म्हणजे अनासक्तबुद्धीने कर्तृत्वमद व फलास्वादाचा त्याग करून भगवदर्पण भावनेने कर्म करणे होय. गीतेत ठिकठिकाणी ही गोष्ट सांगितली आहे.

मेघातून पाऊस स्वच्छच पडतो, पण नदीस पूर येतो तेव्हा पाणी गढूळ झालेले दिसते, कारण त्यात जमिनीचा गाळ वहात येतो. तसे जीवाचे मूळचे ज्ञान शुद्धच असते, पण नंतर विकाराचा गाळ त्यात मिसळतो म्हणून ते मलीन बनते. मातीचे भांडे भाजले तरच त्यात पाणी राहू शकते. तसे मन वैराग्याने भाजले तरच त्यात परमार्थ राहू शकतो. नाव जड आहे पण तिच्याखाली भरपूर पाणी असले तर ती तारून येते. त्याचप्रमाणे कोणत्याही साधनाच्या बुडाशी भक्तीचा जिव्हाळा असेल तरच ती साधने तारून नेऊ शकतात.

ज्ञानासारखे पवित्र दुसरे नाही, असे गीतेत सांगितले आहे. इतर अपवित्र पदार्थ जास्तीत जास्त स्थूल सूक्ष्म शरीराला अपवित्र बनवतील, पण अज्ञान हे आत्म्याला अपवित्र बनविते. ती अपवित्रता जाणे म्हणू अज्ञानाची निवृत्ती. ती आत्मज्ञानाशिवाय होत नाही.

सिनेमाच्या पडद्यावर चित्र नाही, पण भासते. तसे आत्म्याचे ठिकाणी जगाचा त्रैकालिक अत्यंताभाव आहे, पण ते तेथे भासते, म्हणूनच ते अध्यस्त कल्पित, मिथ्या म्हटले जाते.

कासवीच्या पिलाला दूध नाही, कारण, दुग्धोत्पादक अवयव कासवीस नाही. फक्त मातेने प्रेमाने अवलोकन केले की, ते वाढत असते, पण त्याची व मातेची चुकामूक झाली की त्याला शेवाळ, चिखल खावा लागतो. त्याप्रमाणे प्रियाची परम सीमा आत्मा माउलीची व जीवाची अज्ञानाने चुकामूक झाली की, विषयाचा चिखल खाऊन पोट भरण्याची पाळी येते.

विहिर खोदताना पाणी लागले असे म्हटले जाते..वास्तविक पाणी नवीन निर्माण होत नाही. जमिनीत पाण्याचे झरे असतात. वरील दगड, माती, वाळू, मुरुम दूर केला की, असलेलेच पाणी अनुभवास येते. त्याप्रमाणे ब्रह्मज्ञान झाले हे म्हणणे फोलच आहे. विवेकाने पंचकोशाचा, तीन देहाचा निरास झाला की, ते प्रगटच आहे. ''जे विचारितां निरसले। ते प्रपंचे सहजे सांडवले। मग तत्वता तत्त्व उरले।। ज्ञानियासी।।''

परमार्थाकडे कितीही लक्ष लावण्याचा प्रयत्न केला तरी प्रथम मन दुसरीकडे जातेच. श्रवणात प्रवृत्ती न होणे, झाली तरी विक्षेप येणे इ. गोष्टी आरंभी होतातच. प्रथम लक्ष न लागले तरी श्रवण, चिंतन इ. गोष्टी करीतच राहाव्या, म्हणजे हळूहळू मनास त्या आवडू लागतात. लाकूड ओले असले म्हणजे ते जळत नाही, त्याला वाळवावे लागते, त्याप्रमाणे विषयवासनेने ओले असलेल्या मनास ज्ञानाग्नि जाळू शकत नाही, तर प्रथम त्यास वैराग्य, शम, दमादि साधनांनी शुष्क करावे लागते.

मनुष्यमात्राला परमार्थाची आवश्यकता भासत नाही, याचे कारण त्यांना ज्ञान नसते. काही लोकांना कदाचित ग्रंथवाचन अथवा श्रवणाने ज्ञानही असते, पण अनुकूल बुद्धी नसते. त्याचे कारण अश्रद्धा. गीतेत हेच उत्तर ९व्या अध्यायाच्या आरंभी दिले आहे. भगवान म्हणतात, हे ज्ञान सर्व गुह्यात श्रेष्ठ, सर्व विद्यामध्ये श्रेष्ठ, पवित्र उत्तम, प्रत्यक्ष बोध होणारे, आचरण्यांस सुखकारक; अव्यय आणि धर्म्य आहे. या धर्मावर श्रद्धा न ठेवणारे पुरुष, मला येऊन न मिळता मृत्युयुक्त संसाराच्या मार्गात परत येतात म्हणजे त्यांना मोक्ष मिळत नाही. जो साधक विवेक, वैराग्यादिकांनी युक्त होऊन गुरुकृपेने आत्मज्ञान संपादन करतो, तोच योग्य म्हणून मुक्त होतो.

# जेरुसलेममध्ये व्हायला हवी श्रीसाईबाबा शिरडी

— ❖ ❖ ❖ —

***श्री साईबाबांची लीला अगाध-अनंत व अगम्य आहे. त्यामुळे बाबांना काहीही अशक्य नाही असे भक्तांना वाटणे अगदी स्वाभाविक आहे. जेरुसलेममध्ये नुकतीच जागतिक मराठी परिषद झाल्याने मराठी जनतेचे तेथील स्थितीकडे नव्याने लक्ष वेधले आहे. दै. 'कुलाबा शिवनेर'चे सहसंपादक - अरुण जाधव यांनी एक साईभक्त या नात्याने 'कुलाबा शिवनेर'च्या दि. १८/१०/९६ च्या अंकात 'रपेट' स्तंभात 'जेरुसलेममध्ये व्हायला हवी श्री साईबाबा शिरडी' हा लेख लिहून तेथील अशांततेवर एक उपाय सूचविलेला आहे. साईभक्तांच्या केवळ माहितीसाठी आम्ही तो लेख येथे पुनर्मुद्रण करीत आहोत.***

***या लेखात व्यक्त झालेले मत श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष वा विश्वस्तांचे मत आहे असा कृपया कोणी गैरसमज करून घेऊ नये ही विनंती.***

— ❖ ❖ ❖ —

पश्चिम महाराष्ट्राच्या नासिक-नगर शहराच्या मध्यावर असलेले शिरडी हे संततीर्थ स्थळ जगभरातील साईभक्तांचे श्रद्धास्थान ! शिरडीचे साईबाबा संस्थान म्हणजे तिरुपती बालाजीनंतरचे भारतातील वैभवसंपन्न कृपास्थळ. श्रद्धाळू भाविकांचा उदंड ओढा असलेल्या या शिरडीस देशी-परदेशी साईभक्तांचा रात्रंदिवस राबता असतो. संत म्हणजे प्रति परमात्मा. संत देवापेक्षाही श्रेष्ठ आहेत या वचनाची तंतोतंत प्रचिती म्हणजे शिरडी संत साईबाबा. कफनी-धोतरातील साधे-निर्मळ स्वरुपधारी साईनाथ म्हणजे आज मन:शांतिपासून भरकटलेल्या अनाथ भक्तांचे निवांतस्थळ. शिरडीत उतरलेला प्रत्येक भाविक भवसागरातील विवंचनांनी कितीही ग्रासलेला असला तरी तो जेव्हा शिरडीच्या वाटेवर चालू लागतो तेव्हा तो मुक्त जीवनाचा अनुभव घेत असतो. शिरडीत उतरताच तो आणि श्रीसाईनाथ याशिवाय त्या दोघांमध्ये अन्य माध्यम नसते. कलियुगातील या वास्तवतेमुळेच शिरडी हे साईभक्तांचे प्रतिपंढरपूर झाले आहे. अशांत मनुष्यमात्राच्या जीवनाचा शांतिधार !

६ ऑक्टोबर ९६ भाद्रपद कृष्ण ९. अर्थात दशमी श्राद्धाचा योग, रविवार या दिवशी श्री शिरडीमध्ये उतरलो. यावेळेस गोसावी या निवृत्त सर्कल ऑफीसर, ७२ वर्षीय निस्सीम साईभक्तासह शिरडीस येण्याचा योग आला. शिरडी हे असे एक महात्म्यपूर्ण संतस्थळ आहे की जिथे कसलीही घाईगर्दी, हमरातुमरी नसते. साईभक्त या जाणीवेतून साईदर्शनाचा लाभ घेत असतात आणि शिरडीचे अवलोकन - शिरडी आजही साईबाबांची आणि साईभक्तांची आहे. हा याहीवेळी अनुभव आला. शिरडी गावालगतून जाणारा नगर-सिन्नर मार्ग हॅलोजन दिवे आणि ग्रीनपट्ट्यांची नवखी कात घेऊन पळतो आहे. हा बदल पहाता बाबा आणि शिरडी, भक्तांची आहे हे अतीव आनंद देणारे ठरते.

६ ऑक्टोबर या दिवसाचे आणखी एक महत्त्व असे. ज्या दिवशी आम्ही शिरडीत उतरलो तो ज्यांचे कूळ समूळ नष्ट करण्याचा हजारो वर्षांपूर्वी प्रयत्न केला गेला त्या यहूदी धर्माच्या ज्यू लोकांचा 'सिम्नतोराह' हा योगदिन. छळाकडून बळाकडे झेप घेतलेल्या इस्त्रायल देशातील या दिनविशेषाला ज्यूंच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व ! ज्यू हा आजच्या जगातील एकमेव मानव ठरावा की ज्याने चार हजार वर्षानंतर जगभरातील गल्लीबोळातून विखूरलेला असतानाही तेथे जाऊन आपले इस्त्रायल पुन्हा उभे केले. यहूदी धर्म आणि ज्यू यांची जगातील योग्यता आणि आवश्यकता दाखवून दिली. छळाकडून बळाकडे आलेल्या या देशात आज नितांत गरज

कसली असेल तर इस्त्राएलमध्ये एक शिरडी व्हायला हवी. एक साईबाबा हवेत. असा मानव जो राखेतून उठतो असा देश जो वाळूत जीवन फुलवितो. इतकी कमी लोकसंख्या की जो आज जगात आपली अद्वितीय प्रगती घेऊन उभा आहे. तिथे शिरडीची आणि साईबाबांची नितांत आवश्यकता आहे. कारण या देशात आजही शांती नाही. तिथली वाळू आजही रक्तपाताने लाल आणि गरम आहे. नवनिर्माणाच्या वाटेवरील या देशाला म्हणूनच शांतीसाठी हवे आहेत. साईबाबा आणि श्रीशिरडी ! मराठीच्या पंचांग-कॅलेंडरमधील 'सिम्नतोराह'च्या नोंदीवरून असे घडावे असे वाटते.

इस्त्रायलने आपली अद्वियता जशी दाखवून दिली आहे तसेच शिरडीचे श्री साईबाबा मानवी भाविकाचे आणि प्राणिमात्राचे श्रद्धास्थान. कफनीधारी श्री साईंची कृपादृष्टी हा अंतिमत: मानवाच्या मन:शांतिचा आणि मुक्तीचा प्रसाद आहे. हजारो वर्षांनंतर आपला देश पुन्हा उभारणाऱ्या आणि हजारो वर्षांपूर्वी कुलक्षयाचा शिकार झालेला ज्यू. अद्वितीय प्रगतीबरोबर पुन्हा रक्तपाताच्या मार्गाने जात असेल तर पृथ्वीवरील एक चांगला मानव पुन्हा एकदा नष्ट होण्याच्या वाटेवर चालत आहे असेच म्हणावे लागेल, ते होऊ नये असे वाटणारा प्रत्येजण हेच म्हणेल की तिथल्या राज्यकर्त्यांना आणि तरुण रक्ताला श्री साईंच्या कृपाप्रसादाची आवश्यकता आहे. जेरुसलेममध्ये शिरडी यासाठीच आवश्यक आहे. तेथे शिरडी होणे म्हणजे धार्मिक खुळचटपणा वाढविणे नव्हे तर श्री साईनाथ दर्शनाने शिरडीत मानवाला शांततेची पहाट उगवलेली पहावयास मिळाली त्याचीच पुनरावृत्ती जेरुसलेममध्ये होणे होय.

भारतातून आणि महाराष्ट्रातून हजारो वर्षांपासून वास्तव्य करीत आलेल्या ज्यूंच्या पिढ्या इस्त्राएलला आपल्या पितृभूमिला गेलेल्या आहेत. हल्लीच जागतिक मराठी परिषदेचे आयोजन इस्त्राएलमध्ये केले गेले. रायगड जिल्ह्यातील रोहा अष्टमी येथील पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्य केलेल्या अष्टमकर ज्यू घराण्याच्या श्रीमती फ्लोरा सॅम्युअल या आता इस्त्रायलमध्ये स्थानिक असून त्यांनी लिहिलेल्या भारत-इस्त्रायल यांच्यातील सांस्कृतिक संबंधावरील **'संस्कृती संगम'** या पुस्तकाचे प्रकाशन झाले. श्रीमती फ्लोरा या इस्त्रायलमधून मराठी भाषा आणि महाराष्ट्राचे सांस्कृतिक संबंध आजही वृद्धींगत करण्यासाठी झटत आहेत. मराठीच्या विकासासाठी त्या आजही कटिबद्ध आहेत. याची साक्ष म्हणजे इस्त्रायलमध्ये होत असलेल्या परिषदेत त्यांचे प्रसिद्ध होत असलेले **'संस्कृती संगम'** हे पुस्तक त्यांनी त्या पुस्तकात गोव्याच्या मंगेशीचे महत्त्व वर्णिलेले आहे. त्यांना साईबाबा शिरडी निश्चितच भावेल.

२१व्या शतकात फ्लोरा सॅम्युअल यांनी जेरुसलेम आणि महाराष्ट्र यांच्यातील सांस्कृतिक वारसा भक्कम करण्यासाठी चालविलेला प्रयत्न म्हणजे विकसित - प्रगत परंतु अशांत इस्त्रायलमध्ये श्री शिरडीची आणि श्री साईबाबांची आवश्यकता असल्याचे द्योतक म्हणावयास हवे, शिरडी म्हणजे जगभरातील श्रद्धाळू माणसांचे आकर्षणस्थळ. श्रद्धेतून शांततेचा. मन:शांतिचा संदेश देणारे श्री साईनाथ इस्त्रायलमधील महामानवाला शांतिसंदेश देण्यासाठी जेरुसलेममध्ये हवे आहेत. मराठी जागतिक परिषद आणि **'श्री साईलीला'चे द. म. सुकथनकर** यांनी या कामी अवश्य विचार करावा. यामागे स्तोम वा भोळसट भक्ती प्रसारांचा खटाटोप असा अर्थ काढण्यात काहीही हशील रहाणार नाही. कारण श्री साईनाथ ही शांति संवर्धनाची माऊली आहे. संस्कृतीसंवर्धनाची संजीवनी आहे ! जग आज आगीवर उभे आहे. हजारो वर्षांपूर्वी ज्या इस्त्रायलची राख करण्यात आली. जे इस्त्रायल पुन्हा कधीच पृथ्वीवर पुन्हा उभे रहाणार नाही असे ज्यांनी कृत्य केले ते इस्त्रायल ज्यू माणसाच्या दुर्दम्य शक्तीतून उभे झाले अहे. कुलक्षयाचा अनुभव मागे असलेल्या इस्त्रायलला 'छळातून बळाकडे' आणले आहे. ते यहूदी धर्माच्या आध्यात्मिक ताकदीने. परंतु आज तिथली आक्रमक विचारांची एक फळी पुन्हा जेरुसलेमला चुकीच्या मार्गाने नेत आहे. युद्ध आणि रक्तपात हा अंतिमत: विनाशाकडे नेत असतो आणि मानवाचे त्यातून अकल्याण होते. ते थांबावे, इस्त्रायलमध्ये थांबावे यासाठी जेरुसलममध्ये आज हवी आहे एक शिरडी ! एक हवे आहेत श्री साईनाथ ! वरील संदेशातून हाच अर्थ अभिप्रेत आहे. इस्त्रायली माणसाला मन:शांती लाभावी अशी प्रत्येक मानवतावादी माणसाची सदिच्छा असणार आहे. जागतिक घडामोडीत जेरुसलेमची कृती कोणती राहिल हे महत्त्वाने नसून तेथील प्रगत व 'उठत' असलेला माणूस टिकून रहावयास हवा. तो जो पुन्हा संहाराच्या वाटेवर चालतो आहे ते थांबावयास हवे. तो आज बंदूक तलवारीसह वावरतो आहे त्याला शांतीचा संदेश देणाऱ्या साईबाबांची आणि शिरडीची गरज आहे. श्री साईबाबा जेरुसलेममध्ये शिरडीरुपाने असणे म्हणजे हजारो वर्षांनंतर पुन्हा उठलेल्या परंतु पुन्हा युद्धाच्या वाटेवरून वाटचाल करणाऱ्या ज्यू बांधवांना योग्य वाटेवर आणणारे ठरावे. तसा प्रयत्न व्हायला काय हरकत आहे ? ज्या दिवशी आम्ही शिरडीत होतो तो दिवस ज्यूंचा 'सिम्नोतोराह'